प्रकरण चौथे -

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितेतील सौंदर्याविष्कार

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## - प्रकरण चौथे -

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितेतील सौंदर्याविष्कार

कविजीवनामध्ये जन्मदत्त प्रतिभा ही महत्त्वाचीच. मम्मटाने तिला "शक्ती" असे सार्थ नाव दिले आहे. काव्यनिर्मितीच्या व्यापारात प्रतिभेचे महत्त्व अपार असते ही गोष्ट संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी पुन:पुन्हा कबूल केली आहे. काहींनी तिला दैवीदेणगी मानलेले आहे, पण या प्रतिभाशक्तीबरोबरच संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी निपुणता म्हणजे बहुश्रुतता आणि अभ्यास म्हणजे व्यासंग यांनाही महत्त्व दिलेले आहे. मम्मट शक्ती, निपुणता आणि अभ्यास या तिन्ही गोष्टी मिळून एकच काव्यकारण मानतो -

" शक्तिनिपुणता लोकशास्त्र काव्याद्यवेक्षणात् ।
काव्यज्ञशिक्षाभ्यास इति हेतुस्तदुद्भवे ।। " - काव्यप्रकाश [मम्मट]

जन्मजात प्रतिभेबरोबर कवीने आपल्या सभोवतालचा निसर्ग आणि समाज यांचे नीट निरीक्षण केले पाहिजे. अशा निरीक्षणाने प्रत्येक गोष्टीचे बारकावे टिपण्याची निपुणता त्याच्या ठिकाणी आली पाहिजे. अर्थात प्रतिभेचा स्फुल्लिंग प्रज्वलित ठेवण्यासाठी कवीने शक्यतितकी खबरदारी घेतली पाहिजे. प्रा. द. के. केळकर काव्यनिर्मितीमध्ये " प्रतिभा आणि व्युत्पत्ति यांचा संगम हाच श्रेष्ठ होय. "[१] असे मानतात. या संदर्भात विचार करता निसर्गकवींमध्ये जन्मजात प्रतिभेबरोबर निसर्गाच्या निरीक्षणाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. हे कवी उघड्या डोळ्यांनी निसर्गात शिरतात

---

[१] द. के. केळकर, काव्यालोचन, द्वि. आवृत्ती, पृष्ठ ८३.

आणि आपल्या सूक्ष्मनिरीक्षणाने त्यातील एक एक बारकावा टिपून घेतात. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांनी निसर्गाचे सूक्ष्मनिरीक्षण केलेले स्पष्टपणे दिसून येते. हे दोघे कवी भारतातच, पण भिन्न भिन्न प्रांतात जन्माला आले. दोन्ही प्रांतांत आढळणारा समान निसर्ग विषय आणि दोन्ही प्रांतांतील समान वस्तू या दोघांच्याही काव्यात येतात, पण त्यांनी पाहिलेला वेगवेगळा भौगोलिक प्रदेश आपला भौगोलिक ठसा उमटविल्याखेरीज राहात नाही. फुले, फुलपाखरे, निर्झर, रजनी, विहंग, तारे, संध्या आणि उषा, सूर्य, चंद्र, हिरवळ इत्यादी समान गोष्टी त्यांच्या काव्यात दिसतीलच, पण पंतांचा हिमालयवेष्ठित प्रदेश बालकवींच्या काव्यात आढळणार नाही, आणि महाबळेश्वर-वाईकडील काळे कातळ पंतांच्या कवितेत दिसणार नाहीत. कवितेमध्ये निसर्ग आपली भौगोलिक विशिष्टता थोडीफार घेऊन येणारच!

## भौगोलिक विशिष्टता

बालकवींचा बालपणीचा काळ एरंडोल, खानदेश या प्रदेशात गेला. नोकरीच्या निमित्ताने महाबळेश्वर, पाचगणी, वाई इ. ठिकाणच्या निसर्गाचे "साक्षात् दर्शन" त्यांनी घेतले होते. बालकवींच्या आयुष्यात महाबळेश्वरच्या निसर्गाचे मोठे महत्त्व आहे. दत्तोपंत टिळकांच्याबरोबर बालकवी महाबळेश्वरचे निरनिराळे"पॉइंटस्" पाहावयास जात. असेच एकदा ते फिरावयास गेले होते. संध्याकाळ झाली होती. सूर्यास्त होत होता. त्याची सोनेरी किरणे चोहोकडे पसरली होती. भोवताली किर्र झाडी होती. अशा वेळी बालकवींना स्फूर्ती झाली. " दरी दरी घुमवित येई" ही "निर्झर" या कवितेची ओळ साभिनय म्हणण्यास त्यांनी सुरवात केली,

मग तेथेच बसून त्यांनी ती कविता पूर्ण केली.[१] महाबळेश्वरच्या सायंकालीन सुखद वातावरणात निरभ्र आकाशाखाली डोंगरझाडीतून, दगडाधोंड्यातून लोळत-दौडत खाली येणाऱ्या निर्झराच्या दर्शनाने बालकवींना काव्यस्फूर्ती व्हावी असाच हा रम्यप्रदेश आहे. एकदा बॅबिंग्टन पॉईंट पाहात असता सूर्य अस्ताला जात होता. आकाश निरभ्र होते. बालकवींच्या तोंडून "गेला झाला दृष्टिआडही सूर्य तरी अजुनी । पहा चमकते प्रेमपताका पश्चिम दिग्वदनी ।" ही ओळ बाहेर पडली. थोड्या वेळात तो आकाशीचा रक्तिमा नाहीसा झाला. आकाशात एखादी दुसरी तारा डोकावू लागली. ती पौर्णिमेची रात्र होती आणि तेथे चांदण्यात बसून बालकवींनी "संध्यारजनी" ही कविता पूर्ण केली.[२] "मेघांचा पाऊस" या कवितेच्या आरंभीच्या ओळीही दत्तोपंतांबरोबर हिंडताना त्यांना स्फुरल्या होत्या.[३]

एरंडोलच्या प्रदेशाचाही बालकवींच्या कवितेत सहभाग आहे. बालकवींचे सहाध्यायी र.भा.देशपांडे सांगतात, "ठोमरे आपल्या मित्रांबरोबर खेळण्या बागडण्यासाठी गावाबाहेर पडले, तरी त्या मित्रांना टाळीत, आणि मन मानेल तसे वृक्षराजी, रानपाखरे यांचे जागजागी निरीक्षण करण्यातच सारा वेळ घालवीत. या निसर्गसौंदर्याचा पेला आकंठ पिऊन ते धुंद झाले की, मग मित्र, घरदार व काळवेळ कशाचेच भान त्यांना राहात नसे. त्यातही एरंडोल तालुक्यातील पद्मालयावर किंवा भीमकुंडापलीकडील दाट जंगलात जायला मिळाले की, स्वर्ग हाताशी आल्याचा परमानंद त्यांना

---

[१] भा.ल.पाटणकर, बालकवींची समग्र कविता, प्रस्तावना, रामकृष्ण, मुंबई, १९५०, पृ. ३१

[२] " तत्रैव, पृ. ३३ " " "

[३] " तत्रैव, पृ. ३१ " " "

होई ..................... ते आत जंगलात शिरले की एखादी सुंदर कविता घेऊनच बाहेर येत. "गाणा-या पक्ष्यास" ही कविता अशाच एका प्रसंगी लिहिलेली असावी."[१] महाबळेश्वर, एरंडोलच्या, विशेषता महाबळेश्वर--च्या रम्य निसर्गाची छाप बालकवींच्या कवितेत उमटलेली आहे.

"कौसानी" हा सुमित्रानंदन पंत यांचा बालवयातील रम्य प्रदेश! कौसानी, कूर्मांचल प्रदेश ही निसर्गसौंदर्याने समृध्द स्थळे! "भारताचे "स्विट्जरलैण्ड" अशी उपमा महात्मा गांधी यांनी या प्रदेशाला दिली होती. नाना प्रकारचे वृक्ष, अनेक पक्षी, देवदारचे उंच उंच वृक्ष, मंत्रमुग्ध करणारी फुलांची खैरात अशा प्रदेशात पंतांचे बालपण व्यतीत झाले. यानंतरच्या आयुष्यात "कालाकाँकर"चा निसर्ग त्यांचा साथी बनला. अल्मोडा, कौसानी, कूर्मांचल, कालाकाँकर इत्यादी ठिकाणचा निसर्ग पंतांच्या निरीक्षणाचा विषय बनला आहे. सुमित्रानंदन पंत स्वत:ला विसरून कौसानीच्या या रम्य नंदनवनात तासन्तास भान हरपून रमत असत. या "सृष्टीच्या रम्य शृंगारगृहा"चे "मेरा रचनाकाल" या लेखात त्यांनी वर्णन केलेले आहे.[२] ते लिहितात, "काव्यजीवनाचा हा प्रभातकाल अद्यापि मला आठवतो. मी तासन् तास एकांतात बसून, निसर्गातील दृश्यांकडे एकटक पाहात असे आणि एक अज्ञात आकर्षण, माझ्या अंतरात, एक अव्यक्त सौंदर्याचे मायाजाल विणून माझ्या संवेदनेला तन्मय करत असे."[३] सुमित्रानंदन पंत हिमालयाच्या रहस्यमय ,स्थिर, अचल सौंदर्याने प्रभावित झालेले दिसतात.

---

[१] कृ.बा.मराठे, बालकवी, मौज प्रकाशनगृह, मुंबई ४, प्र.आ.१९६२, पृ.८

[२] सुमित्रानंदन पंत, मेरा रचनाकाल, पंत ग्रंथावली, भाग ६, राजकमल दिल्ली, १९८० पृ.२२३

[३] सुमित्रानंदन पंत, आधुनिक कवि, भाग-२, हि, सा, संमेलन प्रयाग, २० संस्करण ५१०० पृ.२८

सूक्ष्मनिरीक्षण :

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांनी निसर्ग सहवासात राहून सृष्टीचे सूक्ष्मनिरीक्षण केलेले आहे. निसर्गाच्या सहवासातच त्यांना आनंद आणि शांती लाभत असे. निसर्गातील रंगसंगत पाहाणे, नदी-नाले, हिरवळ, यांवरून फुलपाखराप्रमाणे फिरणे, पाण्यात पाय सोडून बसणे, आकाशातील मेघमालेच्या आकृतींशी रममाण होणे, दवबिंदू पिणे, फुलांचे चुंबन घेणे, चंद्र-सूर्यांचे उदयास्त बेभानपणे पाहाणे अशा बालकवींच्या अनेक लकबींचा उल्लेख श्री.कृ.बा.मराठे यांनी त्यांच्या चरित्रग्रंथात केला आहे.[१] प्रा.वा.ल.कुलकर्णी यांनी "सौंदर्य न्याहाळणे" हा बालकवींचा कसा आवडता छंद होता हे दाखवून दिले आहे.[२] निसर्गामधील निर्झर, तारका, चंद्रप्रकाश, फुले, अरुणोदय, या त्यांच्या विशेष आवडत्या गोष्टी होत्या. त्यांना गतिमानता आणि चांचल्य यांचे अधिक आकर्षण असल्याचे आढळून येते. "निर्झरा"त त्यांना नाद, लय, गती दिसते. त्याचे खळाळणारे रूप, वेग, गती यांत बालकवींना चैतन्याचा साक्षात्कार होतो. श्री.भा.ल.पाटणकर सांगतात की, महाबळेश्वराच्या रम्य निसर्गदर्शनातून निर्झराचा जन्म झाला आहे. या निर्झराने बालकवींना खरे शिक्षण दिले.[३] निसर्गाच्या अशा सूक्ष्मनिरीक्षणावर बालकवींच्या संवेदनांचे पोषण झाले आहे. निसर्गातील अनेक संवेदना ते आपल्या हृदयात टिपून ठेवीत आणि त्यांना शब्दरूप देत. श्री.उजागरे यांना लिहिलेल्या पत्रात बालकवी म्हणतात, "[महाबळेश्वरचे] ते अदृष्टपूर्व सौंदर्य पाहून कविता लिहिण्यास अवसर सापडला नाही, तरी

---

[१] कृ.बा.मराठे, बालकवी, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९६२ पृ. ६४, ६५

[२] वा.ल.कुलकर्णी, मराठी कविता, जुनी आणि नवी, पॉप्युलर प्र.मुंबई, प्र.आ.१९८० पृ.१४८.

[३] भा.ल.पाटणकर, बालकवींची समग्र कविता, रामकृष्ण बुक डेपो, मुंबई, द्वि.आ.१९५० पृ.९

त्या अनुपम सृष्टिसौंदर्याचे लहान लहान फोटो माझ्या छुप्या कॅमे-यामध्ये-डोक्यामध्ये घेऊन ठेवले आहेत. ते केव्हा ना केव्हा रंगवल्याखेरीज मी राहणार नाही." [१] डोक्यामधील छुप्या कॅमेऱ्यात लपविलेले अनुपम निसर्ग--सौंदर्याचे हे लहान लहान फोटो त्यांच्या संवेदनातून व्यक्त झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

बालकवींच्याप्रमाणेच सुमित्रानंदन पंत देखील एकांतामध्ये निसर्गात भटकत राहिलेले आहेत. तुहिन बिंदू होऊन चंद्रकिरणांवर स्वार व्हावे, सोनेरी वाळूचे कण व्हावे. चंद्रकला बनावे, विहगबालिका होऊन वनदेवीची गाणी गावीत, हसरे गुलाब फूल बनून बालपणाचा आनंद लुटावा अशा आपल्या इच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. कूर्मांचल प्रदेशातील निसर्गाचा आपल्यावरील प्रभाव सांगताना पंत स्वत: म्हणतात, "कविता करने की प्रेरणा मुझे प्रकृति निरीक्षण से मिली है, जिसका श्रेय मेरी जन्मभूमि कूर्मांचल प्रदेशको है।" [२] या कूर्मांचल प्रदेशातील एक-एक चित्र त्यांनी आपल्या हृदयात साठवून ठेवलेले आहे. "सावन-भादों" या कवितेत ते म्हणतात,

"इस तरह मेरे चितेरे हृदय की
बाहय प्रकृति बनी चमत्कृत चित्र थी,"

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांनी निसर्गाचे असे सूक्ष्म निरीक्षण केलेले आहे. निसर्गाच्या या सूक्ष्मनिरीक्षणामुळे त्यांच्या कवितेत

---

[१] कृ.बा.मराठे, बालकवी, मौज प्रका.मुंबई, प्र.आ.१९६२. पृ.९२

[२] सुमित्रानंदन पंत, आधुनिक कवि, भाग-२, हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग संवत् ५१००, पृ.८

इंद्रिय संवेदनांची केवढी तरी समृध्दी आढळून येते. त्यांच्या काव्यात व्यक्त झालेल्या संवेदनांतून त्यांच्या निसर्गनिरीक्षणाची सूक्ष्मता स्पष्ट व्हावयास हरकत नाही.

[१] संवेदना सौंदर्य

बालकवी आणि पंत या दोघांच्याही कवितेत रंग, नाद, गंध, स्पर्श आणि रस यांच्या अनेक संवेदना आविष्कृत झालेल्या आहेत. त्यांच्या कवितेत संवेदनांची ही श्रीमंती सर्वत्र आढळते. त्यांच्या संवेदनांचा एकत्रित अभ्यास मोठा उद्‍बोधक होण्यासारखा आहे.

[अ] रंगसंवेदना : बालकवी

बालकवींना रंगाचे मोठे आकर्षण होते. त्यांच्या रंगासक्तीचा अनेकांनी उल्लेख केलेला आहे. "बालकवींच्या कवितांमधून मूळचे रंग झळाळून उठतात." [१] अशा शब्दात डॉ. अनुराधा पोतदार त्यांचा गौरव करतात, तर "बालकवींच्या निर्मळ रंगसंवेदनेचा आविष्कार हा त्यातील सूक्ष्म तरल छटांसह शब्दाशब्दांतून व्यक्त होतो" [२] असे डॉ. रा. शं. वाळिंबे सांगतात. स्वत: बालकवींना रंग हे "जडतेला जीवन देणारे" संजीवकच वाटतात.

बालकवींना निसर्गात रंग दरबारच भरलेला दिसतो. सृष्टीच्या प्रत्येक कणाकणात त्यांना प्रथम जाणवते ती तेजाची अभिव्यक्ती. या

---

[१] डॉ. अनुराधा पोतदार, सहकंप, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्र. आ. १९८२ पृ. १४७.

[२] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी, [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल, पुणे, प्र. आ. १९८६, पृ. ३१.

तेजाचा आविष्कार कणाकणांत दिसू लागल्याने बालकवी या तेजाचे अनेक प्रकारे, अनेक पध्दतींनी वर्णन करतात. हे तेज त्यांना आकाश, गिरिशिखरे, दशदिशा, ग्रह, तारे, नक्षत्र, शुक्र, तारका, मेघ या सर्व घटकांवर पसरलेले दिसते. हे तेज "दिव्य" आहे, "तेजालोका"तून आलेले आहे, अशी त्यांची श्रध्दा आहे -

" ग्रहा ग्रहा वर भरले तेज
तेजाची लयलूटच आज
देव करिति जणु स्वगति
तेज दाटले, शांति दाटली " - [तडाग असतो तर]

अशा शब्दांत या तेजाचे वर्णन करुन बालकवी तडाग बनून त्यांच्या प्रतिबिंबित रुपाशी एकरुप होऊ इच्छितात. अशा तेजाचा उल्लेख "कविबाळे", "फुलराणी", "शुक्रोदय", "अरुण" इत्यादी कवितांतून आला आहे. कधी त्यांना "तेजाचा पडदा" दिसतो आहे, तर कधी "तेजाची शांत पताका" फडकताना आढळते आहे. चंद्र "नव तेजाची ओढणी" तारकांना देतो, तर शुक्रतारा "दिव्य कळ्यांचा मुकुट" शिरावर धारण करुन येतो. "तेजाची जणू फुटलेली पेठ"च बालकवी निसर्गात पाहतात आणि त्यांना जाणवणारे सौंदर्यही "तेजाची वारुणि" पिऊन येते -

"सौंदर्य वेडे झाले तेजाची वारुणि प्याले" - शुक्रोदय.

या दिव्यतेजाच्या अनेक छटा बालकवींनी वर्णन केल्या आहेत. सफेद रंगाचे वर्णन करताना बालकवींना साकल्याने कल्पतरुची फुले, बगळ्यांची माळ, मोत्याची छटा यांची आठवण होते. "संध्यारजनी" मधील तारकोत्सव पाहून कवी प्रश्न करतो -

" या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला ?
कल्पतरूची फुले उडाली की वाऱ्यावरती ?
आकाशीच्या गंगेला की बुद्‌बुद् हे येती ?
नवटिकल्यांची चंद्रकळा की गगनश्री नेसे ? " [संध्यारजनी]

"फुलराणी"त शुभ्र धुक्याच्या वस्त्राचा आणि दवमय अंतरपाटाचा उल्लेख आला आहे. "पाखरास" कवितेत ते "हिमाचे अवगुंठन" आणतात तर, "कवीची इच्छा" म्हणून मोत्याचे पाणी घालून "ब्रह्मांडाची सदाफुली" फुलवतात. चंद्राची आणि तारकांची योजना अनेक कवितांत केली आहे. या तारका कधी मशाली बनतात तर, कधी रजनीचे नेत्र असतात.

बालकवींना पिवळा रंगही आवडतो, कारण तो हर्ष आणि उल्हास यांची लयलूट करतो अशी त्यांची समजूत आहे. "श्रावणमासा"त तरूशिखरावर, उंच घरांवर पडलेले पिवळे पिवळे ऊन त्यांना जाणवते. अरूणोदय काळी हर्षोत्कटतेने गाऊ-नाचू लागलेली, वेडावून गेलेली पिवळे कुरणे त्यांना दिसतात. "आवाहन" कवितेत त्यांना "पक्वपणाची पिवळी छाया" सुंदरतेवर रांगताना भावते. हिरवा रंग हा बालकवींचा आवडता रंग, महाराष्ट्रातील निसर्गाचा हा भरगच्च रंग. पाचूची हिरवी शेते, वनमालेचा हिरवा शेला, तुर्रेबाज गवताची फुले, हिरव्या वेली, गर्द दाटलेली झाडी अशा अनेक ठिकाणी हा हिरवा रंग बालकवींना आकर्षित करतो. या हिरव्या रंगाबरोबर अन्य संवेदनाही त्यांच्या कवितेत प्रकट झालेल्या दिसतात. त्यांचे "हिरवे हिरवे गार गालिचे", "हरित तृणांच्या मखमालीचे" असतात. त्यांची इवलाली रानफुले हसत हसत फुलत असतात आणि "ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन" त्यांचा निळासावळा झरा बेटाबेटातून वाहात असतो. या "हिरव्या रंगाचे वर्णन करताना बालकवी खुषीत येतात" असा अभिप्राय

डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी व्यक्त केला आहे.[१]

बालकवींनी "फुलपाखरु-फुलवेली" या कवितेत फुलपाखराला "माणिक" म्हटले आहे आणि आपल्या या बालसवंगड्यावर लाल रंगाचा साज चढविला आहे. त्यांच्या फिकट निळीने रंगविलेल्या मेघांच्या कापसावर कुणीतरी कुसुंब्याचा गुलजार हात फिरवतो. निळ्या ढगांच्या कडांवरुन पसरणारे सूर्यकिरण त्यांची दृष्टी वेधून घेतात आणि त्यांची "संध्यादेवी" मेघाचे भूर्जपत्र हातात धरुन कुंकुमरसाने नवलेख लिहिते -

"मेघाचे करि भूर्जपत्र धरुनी अस्ताचली प्रत्यही
स्वर्गीचे नव लेख कुंकुमरसे ती संध्यादेवी लिही" - [प्रेमलेख]

त्यांचा रविराया संध्येच्या गुलाबी गालाचे चुंबन घेतो आणि दिवसयामिनी--च्या प्रणयसंगमकाळी म्हणजेच अरुणोदयाच्या वेळी प्रणयाच्या गुलाबी छटा आकाशभर पसरतात. आपली मोत्याची माळ चोरुन नेल्याचे समजताच नभःश्री रुसते आणि तिचे गाल लाल होऊन जातात - "आली लाली गालाला।" अशाप्रकारे तिच्या अनुरागाला रोषाची झालर प्राप्त होते. कधी त्यांना प्रीतीचा रंग रुधिराच्या रंगासारखा भासतो, तर कधी हा रंग अंगार बनून सूर्योदयाबरोबर येतो. बालकवींचा काळा रंग निराशा, भय आणि रहस्यमयता व्यक्त करतो. दशदिशा काळा बुरखा पांघरुन "काळा बागुल" उभा करतात. "काळास" या कवितेत "भूतलाला वेष्टणारा", "मातलेला अंधार" त्यांना जाणवतो. कधी काळ्या अंधारात दडून "यमाचे दूत" हाका मारत असल्याचे भावते, तर कधी "खोल भूमिगर्तेत अंधार खळाळत"

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी, [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल, पुणे, प्र. आ. १९८६, पृ. ३१.

असल्यासारखे भासते. "आवाहन" या कवितेत "काळवंडलेले वातावरण" आपल्याला दिसते. अंधार असा भयावह असला तरी खेळासाठी कधी कधी त्याची आवश्यकता असते. "संध्यारजनी"मध्ये लपंडावासाठी काळा अंधार येतो.

निसर्ग म्हणजे त्या अदृश्य कलाकाराचे रंगमंदिरच. उष:काली आणि संध्याकाळी त्याची उज्ज्वलता काय वर्णावी! बालकवींच्या निसर्गात अनेक रंग गोडीगुलाबीने एकत्रित आलेलेही आढळतात. पावसाळ्यातील संध्याकाळ त्यांना दिसते ती अशी -

" व्योमपटी जलदांची झाली दाटी,
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी.
नील कुणी इन्द्रमण्याच्या कान्तिहुनी,
गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी,
तेजात धूमाचे उठती झोत
चकमकती पांडुरही त्यापरिस किती । "

काजळाचा काळा रंग, इंद्रमण्याचा निळा रंग, जांभळट पांढरा, धुरकट पांढरा, चमकणारा पांढरा असे भिन्न रंग येथे आले आहेत. फुलराणीच्या स्वयंवराला येणारे व-हाडी मेघही लाल सुवर्णी झगे घालून, गुलाबी फेटे बांधून मोती उधळीत येतात. मिश्रित रंगांच्या संवेदनेच्या दृष्टीने बालकवींच्या "अरुण", "बालविहग", "संध्यारजनी" या कविता उल्लेखनीय आहेत. बालकवींचे रंगाचे आकर्षण त्यांतून स्पष्ट व्हावयास हरकत नाही. "बालकवींची रंगसंवेदना ही दृक् संवेदनेचा प्रत्यय देणारी आहे." [१] या

---

[१] श्री. भ. श्री. पंडित, आधुनिक कवितेचे प्रणेते, सुविचार प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९५२, पृ. १८०.

प्रा. पंडितांच्या म्हणण्याचे कुणालाही अनुमोदन करावे लागेल. डॉ. अनुराधा पोतदारांचेही "बालकवींच्या कवितांमधून मूळचे रंग झळाळून उठतात इतके त्यांचे रंगाचे वेड असाधारण आहे."[१] हे म्हणणेही अमान्य होण्याजोगे नाही.

## रंगसंवेदना : सुमित्रानंदन पंत

बालकवींच्याप्रमाणेच पंतांनाही रंगाचे अनिवार वेड आहे. त्यांच्या या रंगाच्या आकर्षणाचा अनेक हिंदी समीक्षकांनी उल्लेख केलेला आहे. डॉ. रामरतन भटनागर लिहितात, "सच तो यह है कि पंतजीने रूप, रंग, और ध्वनियोंका एक अनोखा संसार खडा कर दिया है।"[२] श्री. एन. पी. कुट्टनपिल्ले यांनी सुमित्रानंदन पंतांच्या निसर्गातील विविध रंगांच्या परिचयाचा गौरव केलेला आहे.[३] पंतांचा "सोनेरी" हा सर्वात आवडता रंग आहे. कनक, स्वर्ण, सुवर्ण, सुनहला, स्वर्णिम अशा शब्दांनी त्यांनी सोनेरी रंगाच्या छटा व्यक्त केल्या आहेत. त्यांचा प्रभातकाल "स्वर्णवस्त्र परिधान" करून जगाला "उज्ज्वल आणि महान" असे आश्वासन देतो. त्यांची विहगबालिका "स्वर्णजाल-सी-तान" छेडून त्यांचे कुतूहल जागे करते. त्यांच्या दिवसाला सायंकाळी "सुवर्ण अवसान" प्राप्त होते, आणि आपल्या नीरव भावजगतांत पक्ष्याप्रमाणे फिरत असताना या जगाच्या उपवनात ते आपले

---

[१] डॉ. अनुराधा पोतदार, सहकंप, मेहता पब्लिशिंग, पुणे. प्र. आ. १९८२ पृ. १४७.

[२] डॉ. रामरतन भटनागर, कविपंत, युनिवर्सल प्रेस, इलाहाबाद पृ. २६०.

[३] एन. पी. कुट्टनपिल्ले, पंत छायावादी व्यक्तित्व और कृतित्व, जयप्रकाशन, हैदराबाद, प्रथम संस्करण, १९७०, पृ. १४१.

"स्वर्ण-नीड" बांधतात. आपल्या सोनेरी घरकुलात त्यांना पडणारी स्वप्नेही सोनेरी असतात. बालकवींच्या कवितेत तेजाचा वारंवार उल्लेख येतो, तर पंतांच्या कवितेत सोनेरी रंगाची उधळण आढळते.

पंतांच्या कवितेत "हिम-गौर" रंगाचीही लयलूट आहे. त्यांना जे हास्य जाणवते ते "हिम-हास"च असते. त्यांचे मेघ "ज्योत्स्नाके हिम", "शशि के यान" असतात. चांदण्यारात्री नभातून विहार करणाऱ्या मेघांचे असे उज्ज्वल चित्र ते रेखाटतात. त्यांना जल हे प्राय: हिम-जल भासते. "वीचि-विलास" या कवितेत त्यांनी जललहरींचे वर्णन केले आहे. लहरींवर खेळणारे चांदण्याचे प्रतिबिंब म्हणजे त्यांना स्वर्ग-पृथ्वीचे मीलन वाटते आणि या प्रणयव्यापारात चांदीचे चुंबन घेतले जाते. पंतांनी तारका, चंद्र यांची जशी फिकट छटा दाखवली आहे, तशीच त्यांची शुभ्र धवल शोभाही दाखवून दिली आहे. त्यांचा "एक तारा" बालकवींच्या शुक्राऱ्याप्रमाणेच ठळकपणे आपल्यासमोर येतो. -

" पश्चिम नभ में हूँ रहा देख
उज्ज्वल, अमन्द नक्षत्र एक। " [एकतारा]

"नौकाविहार" या कवितेत चांदण्यारात्री केलेल्या गंगानदीवरील नौकाविहाराचे चित्र रेखाटताना कवीने चांदण्यारात्रीचे जलप्रवाहातील सुंदर प्रतिबिंबही साकार केलेले आहे. शुभ्र रजत तेजाचे फेसाळते गतिमान सौंदर्य रेखाटताना कवी वर्णन करतो,

" चाँदी के साँपों-सी रलमल नाचती रश्मियाँ जल में चल
रेखाओं-सी खिंच तरल सरल
लहरोंकी लतिकाओंमें खिल, सौ-सौ शशि, सौ-सौ उडु झिलमिल
फैले फूले जल में फेनिल। " [नौकाविहार]

पंतांच्या कवितेत काजव्यांचा उल्लेख वारंवार येतो. द्वारपाल बनलेले काजवे त्यांना कधी पहाटेच्यावेळी पेंगताना दिसतात, तर त्यांच्यामध्ये कधी त्यांना मलीन दीपाचा भास होतो.

बालकवींप्रमाणेच सुमित्रानंदन पंतांना पिवळ्या रंगातून पक्वतेची जाणीव होते. त्यांची पिकलेल्या धान्याची पिवळी डहाळी "हेम-हास" करीत असते, आणि अंतिम सूर्याची पिवळी पिवळी किरणे त्यांचे स्वप्नांचे सोनेरी घर त्यांच्या--पासून हिरावून घेतात -

" ये पीले-पीले प्रियतर
अन्तिम आभा के कृश कर
मेरा स्वर्ण सदन स्वप्नोंका
छीन रहे हैं छिप छिप कर। " [वीणा-४१]

लहानपणच्या कोमल गात्राचे वार्धक्यात पिवळे पान होते याबद्दल त्यांनी खंतही व्यक्त केली आहे. या पिवळ्या रंगापेक्षा हिरव्या रंगाच्या संवेदना पंतांच्या कवितेत अधिक आढळतात. त्यांच्या वा-याच्या लकेरीला, तिचे "मृदु गान" हिरवळीने झाकून, वृक्षांची पाने फुलांच्या पाळण्यात झोके देत असतात. "वसंतश्री" कवितेमध्ये हिरवळीवर खेळणा-या वसंतश्रीचे वर्णन करीत कवी सृष्टिमातेला विचारतो -

" उस फैली हरियाली में,
कौन अकेली खेल रही माँ।
वह अपनी वय बाली में ? " [वसंतश्री]

उषेच्या मृदु लालीमध्ये हिरवळीवर खेळणा-या या मधुमासाच्या रूपरंगाचे कवीने सुंदर चित्र रेखाटले आहे. "वसंतश्री" मधील रूप, रंग, रज, सुरभी, मधुर-मधू या सर्व गोष्टींनी कवी मोहित झालेला दिसतो. वसंतऋतूतील

नवपल्लवांनी बहरलेली हिरवी वनराजी कवी पंतांना हिरव्या रंगाबरोबर स्पर्शसंवेदनाही जाणवून देते -

" नव वसंत के सरस स्पर्श से
पुलकित वसुधा बारम्बार
सिहर उठी स्मित शस्यावलिमें
विकसित चिर यौवन भार। [अनंग]

बालकवींना मेघांत कुसुंबी रंग दिसतो, तर पंतांना फुलांत लाल व केशरी रंगाचे मिश्रण असलेला "गेरूवा" रंग दिसतो. विहगबालिका बनून गेरूव्या रंगाचे वस्त्र परिधान करण्याची इच्छा ते व्यक्त करतात. वसंतऋतूतील नव्या पालवीत त्यांना रुधिराचा रंग जाणवतो, तर अनंगाच्या क्रियाव्यापारात लज्जेची लालिमा आढळते. त्यांनी झंझावात, प्रलय, भूकम्प, वन्ही यांसारख्या निसर्गाच्या उग्र रूपांतून लाल रंगाची उग्र छटा व्यक्त केली आहे. संध्येची लाल ज्वाला प्रात:कालीन सोन्याचा संसार जाळून टाकत आहे असे त्यांना भासते. एरव्ही उज्ज्वल असलेल्या तारका त्यांना कधी ठिणग्यासारख्या वाटतात आणि त्यांचा चंद्र कधी निखाऱ्या--प्रमाणे लाल बनतो, आणि मग त्याची किरणे त्यांना ज्वालेप्रमाणे दाहक वाटतात. संध्याकालीन केशरी, लाल, सोनेरी रंगाच्या मिश्रणात त्यांना लाखेच्या लाल रंगातून भडकणारी आग दिसू लागते.

सुमित्रानंदन पंतांच्या कवितांतून काळ्या रंगाच्याही अनेक संवेदना व्यक्त झाल्या आहेत. "बादल" कवितेत काजळासारखे काळे असलेले "धूम धुआँरे" मेघ त्यांनी वर्णिले आहेत. "सावन भादों" या कवितेत श्रावणाच्या कुंद पावसाळ्यात दिसणाऱ्या हिमालयाचे चित्र येते. कवीला अर्धा उजेड, अर्धा अंधार असे मिश्र वातावरण सगळीकडे दिसते. दुधाळ बाष्प भरलेले

मेघ गडद काळी पर्वतशिखरे झाकाळून टाकतात. जलभाराने जडावलेले काळसर मेघ संथपणे खालीखाली येतात आणि धुके बनून ते पर्वताच्या उताराावर विखरून जातात. कवीचे डोळे कधी अंधुक सावळया मेघासारखे भरून आलेलेही दिसतात.

सुमित्रानंदन पंतांची रंगसंवेदना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील उदाहरणे पाहाण्याजोगी आहेत.

१. "गंगा के चल जल में निर्मल–कुम्हला किरणों का रक्तोत्पल
है मूँद चुका अपने मृदु दल।
लहरों पर स्वर्णरेख सुंदर पड गयी नील, ज्यों अधरोंपर
अरुणाई प्रखर शिशिर के डर। " [नौकाविहार]

२. " धधकती है जलदों से ज्वाल
बन गया नीलम व्योम प्रवाल
आज सोने का संध्याकाल
जल रहा जतुगृह–सा विकराल " [आँसू–पल्लव]

३. " रुपहले, सुनहले आम्र बौर,
नीले, पीले औ' ताम्र भौंर, [गुंजन]

४. सजनि। कहाँ शुचि जन्म स्थान
मानस की फेनिल लहरों पर
किस छवि की किरणें अज्ञात
रजत स्वर्ण में लिखती अविदिन
तारक लोकों की शुचि बात ? [स्वप्न–पल्लव]

५. है टूट पडा भू पर अम्बर।
धँस गये धरा में सभय शाल
उठ रहा धुँआ, जल गया ताल। "

या उदाहरणांत आपल्या किरणांच्या पाकळ्या मिटवून घेणारा सायंकालीन आर्त सूर्य, जललहरींवरील निळसर पडत जाणारी स्वर्णरेख, हिंदोळ्यात लालसर ओठावर येणारा कालिमा, ढगांच्या ज्वालांनी लालसर पडलेले निळे आकाश, लाक्षागृहाप्रमाणे जळू पाहणारी सोन्याची संध्याकाळ, रुपेरी चंदेरी रंगाच्या आंब्याच्या मोहरावर फेर धरणारे निळे, पिवळे आणि तांबसर भृंगे, स्वप्नांची सोनेरी सरिता, मानसाच्या फेनिल लाटांवर तारका, जगतातील पवित्र गोष्टींचे रजत-स्वर्ण लिपीत लेखन करणारी किरणे, मेघांच्या रूपाने पृथ्वीवर घरंगळलेल्या आकाशामुळे भयभीत होऊन लपलेले शालवृक्ष, जलाशयाला आग लागून त्यावर मेघांचा उठलेला धूर - अशा सुरेख संवेदना येथे नेमक्या टिपलेल्या आहेत.

उष:काली आणि संध्याकाळी आकाशात अनेक रंग आढळतात. या सर्व रंगांचे नेमके चित्रण करणे हे निसर्गकवी पुढील आव्हान असते. वर दिलेल्या काही उदाहरणांत कवीने ते समर्थपणे पेललेले दिसते.

[ब] <u>नाद, संवेदना : बालकवी</u>

निसर्गात जसे रंगवैभव भरलेले आहे तसेच नाद-माधुर्यही भरून राहिलेले आहे. पक्षी, झरे, नदी, मेघांचे गर्जन, वाऱ्याची मंद झुळूक यांतून ध्वनी ऐकायला येतो, तर फुलपाखरे, फुले यांचे नर्तन, झऱ्याचा वळसे घेत जाणारा प्रवाह, पक्ष्याची भरारी, मेघांची मंद मंद चाल या सर्वांतून ध्वनीबरोबर एक लय, गती अनुभवाला येते. या सर्वांचा एकत्रित प्रभाव करणारे एखादे निसर्गदृश्य-ध्वनिचित्र समोर उभे करणे यात कविकौशल्य असते.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत हे दोघेही याबाबतीत अत्यंत समर्थ कवी ठरतात.

बालकवींच्या कवितेतील नादसौंदर्य हे स्वानुभूतीतून निर्माण झालेले आहे. तारकांचे संगीत, आकाशाची शोभा, जलाशयाची गतिस्थिती यांतून येणारे संदेश ग्रहण करणे व ते सौंदर्य उकलून जगापुढे ठेवणे यातच बालकवींनी आपले जीवित मानले होते.[१] बालकवींच्या "अर्थवाही नादब्रह्माचा" गौरव करून प्रा. गंगाधर गाडगीळांनी त्यांच्या कवितेतील नादमाधुर्य आणि नादविरोध उदाहरणांनी स्पष्ट केला आहे.[२] नाद, अर्थ, ध्वनी या गुणत्रयाचा सुंदर संगम बालकवींच्या अनेक कवितांत आढळतो.

बालकवींना निसर्गात "निर्झर" हा सर्वांत जवळचा घटक वाटतो, याचे कारण तो नादमय आहे हेच असते. बालकवींनी त्याला "कविराज", "कवीश्वर" ही पदवी दिली आहे. गिरिशिखरे, दरीदरी घुमवत येणाऱ्या त्याच्या संगीताचे, त्याच्या गंधर्व गायनाचे बालकवी वर्णन करतात -

"पर्वत हा ही दरीदरी तव गीते भरली सारी
गाण्याने भरली राने वर-खाली गाणे। गाणे।
गीतमय स्थिरचर झाले गीतमय ब्रह्मांड डुले।
व्यक्त तसे अव्यक्तहि ते तव गीते डुलते - झुलते। "

निर्झराचे हे गीत बालकवींना कृष्णाच्या मुरली स्वरासारखे वाटते. हिरव्या वेली निर्झराच्या गोपी बनून जातात आणि तो स्वत: श्रीकृष्ण बनतो,

---

[१] कृ. बा. मराठे, बालकवी, मौज प्रका., मुंबई, प्र. आ. १९६२, पृ. ९४.
[२] गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रका. मुंबई, प्र. आ. १९७७ पृ. ४५.

मग त्याच्या वेणूचा सूर चराचरावर राज्य करतो. "आनंदी-आनंद" या कवितेत मंद गती वाहणाऱ्या निर्झराचा उल्लेख येतो. या निर्झराच्या मंद गतीच्या लयीवर वृक्षतती डोलत राहतात. "अरुण" या कवितेत आकाशातून "प्रेमाचा लोंढा" खाली येतो. कवी भव्यगिरींना हा लोंढा निजशिखरावर झेलून घ्यायला सांगतो. बालकवींचा राईतून वाहणारा "खळखळ ओढा" आपल्याच नादात गीत गातो, तर गवताच्या गाण्यात "उच्छृंखल ओढा" वाहात असलेला दिसतो.

निर्झराप्रमाणे नादमय शब्द असणारा दुसरा घटक म्हणजे पक्षी। हा पक्षी निजदेहाचा आंदोल करून झुलतो, भिंगोरी सारखे झोके घेतो, जादूच्या कांडीप्रमाणे आकाशात क्षणात येथे तर क्षणात तेथे नाच करतो. त्यांचा पक्षी,

" हासवितो लतिकाकुंजांना। प्रेमे काढी सुंदर ताना
आनंदाच्या गाऊन गाना। आनंदे रमतो. "

निर्झर, पक्षी यांच्या गायनांत कवीला जसे स्वरबध्द संगीत जाणवते, तसेच एखाद्या दृश्यातून, हालचालीतून लय, ताल, गती यांचे सौंदर्यही जाणवते. आणि मग कवी एखादे सुरेख ध्वनिबिम्ब मूर्त करतो -

" ऊठ कोकिळा। भारद्वाजा। उठ गडे, आता,
मंगल गानी टाका मोहुनि जगताच्या चित्ता।
सरिते। गाणे तुझे सुरांमधि या मिळवी बाई।
साध्याभोळ्या तुझ्या गायना खंड मुळी नाही।
पिवळी कुरणे या गाण्याने हर्षोत्कट झाली।
गाऊ लागली, नाचु लागली, वेडावुनि गेली। " [अरुण]

कोकिळा, भारद्वाज या पक्ष्यांचे आवाज, सरितेचे गाणे, या गाण्याने गाऊ नाचू लागलेली पिवळी कुरणे या सर्वांतून कवीने एक संश्लिष्ट चित्र येथे उभे केले आहे. बालकवींचा भ्रमर कमळावर मुग्ध होऊन गुंजारव करतो. कवी त्याला आपल्या रम्य गायनाने चारी दिशा वेधून टाकावयास सांगतो. [भ्रमर आणि कवी] "सृष्टीच्या गायकास" या कवितेत विहगाला आपल्या गीताने सा-या जगताला भारून टाकावयास सांगितले आहे. कवी "गवताचे गाणे" देखील आपल्याला ऐकवतो. निर्झर आणि पक्ष्याप्रमाणे बालकवींचा वारादेखील चराचराशी निगूढ गीते गात वातावरणात मधुर सूर सोडतो. हा प्रभात वायू कधी मंद मंद वाहात वनराजीला डोलवितो तर, कधी स्वर्भूमीचा हात जुळवून नाच-नाचत राहातो. बालकवींची रजनीदेवी अंगाईगीत गाते तर संध्या प्रेमभराने गायन करते. फुलराणीच्या स्वयंवरात सृष्टीचे भाट मंगलपाठ गातात, मारुतराणा सनई वाजवतो, कोकिळ तानावर ताना घेऊ लागतो, निर्झर पखवाज वाजवितो आणि भारद्वाज नाचू लागतो. संपूर्ण सृष्टी एक संगीत जलसाच साजरा करते. पावसात भिजलेले पक्षी आडोसा घेऊन आपल्या पंखावरचे पाणी झटकतात आणि स्वतःला सावरतात. हे चित्र एकाच ओळीत बालकवींनी साकार केले आहे -

" फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती. "

पहाटेच्या वेळी गवतावर ओघळणारे दवबिंदू बालकवींना नुसते दिसत नाहीत, त्यांचा सूक्ष्म आवाजही त्यांना जाणवतो -

" दवमाला उपमा तरि कसली त्याला
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरती " [फुलपाखरे-फुलवेली]

बालकवींच्या निसर्गात एरव्ही आनंदी-आनंदच भरून राहिलेला असतो, पण

क्वचित दूर काटेरी झुडुपातून येणारे एखाद्या पक्ष्याचे हूँ - हूँ चे खिन्न नीरस एकांतगीतही त्यांना ऐकू येते.

## नाद संवेदना : सुमित्रानंदन पंत

बालकवींच्या प्रमाणेच सुमित्रानंदन पंतांची कविताही नादसौंदर्याने निथळून निघालेली दिसते. अनेक हिंदी समीक्षकांनी त्यांच्या नादसौंदर्याचा गौरव केलेला आहे. डॉ. रामरतन भटनागर त्यांच्या नादसौंदर्याचा गौरव करतात आणि या कवीच्या नादसौंदर्याबद्दल लिहितात, " चित्रसौंदर्य की अपेक्षा नादसौंदर्यकी ओर उसका ध्यान अधिक है। "[१] डॉ. अवध-बिहारी राय यांनी त्यांच्या कवितेत आढळणाऱ्या "ईश्वरीय संगीता"चा उल्लेख केला आहे.[२] सुमित्रानंदन पंतांना निसर्गात सगळीकडे "मधुगान" भरून राहिले आहे असे वाटते. त्यांना ऐकू येणाऱ्या या मधुगानाबद्दल ते सांगतात, " आरंभसे ही मुझे मधुमय गान अपने चारों ओर धूली की ढेरी में अनजान बिखरे पडे मिले हैं।"[३] निर्झर, विहग, मेघ, बिजली, रातकिडे, मोरनी, भ्रमर, बेडूक यांचे स्वर त्यांनी शब्दात पकडलेले दिसतात.

बालकवींच्याप्रमाणे निर्झर हा पंतांचाही लाडका आहे. त्यांना निर्झराचे अनंत, उज्ज्वल आणि स्वर्गीय गीत ऐकू येते. "निर्झरी" या कवितेत ते तिला विचारतात,

" यह कैसा जीवन का गान

---

[१] डॉ. रामरतन भटनागर, कविपंत, युनिवर्सल प्रेस, इलाहाबाद, पृ. २३०.
[२] अवधबिहारी राय, पंतकी काव्यगत मान्यताएँ और उनका काव्य, संजय प्रका. वाराणसी, १९८० पृ. ५८.
[३] सुमित्रानंदन पंत, गद्यपद्य, पृ. २.

अलि, कोमल, कल मल टल मल ?
अरी शैल बाले नादान
यह अविरल कल कल छल छल ?" [निर्झरी]

"निर्झर गान" या कवितेत कवी निर्झराच्या "स्वर्गिक" झर झर गायनाचा गौरव करून अन्य सर्वांच्या गायनापेक्षा हे गंधर्व गान अमर असल्याचे सांगतो. तारे, मोती, फेन, अश्रू, वाळू, यांच्या गीतांचा उल्लेख करून कवी निर्झर गान अमर असे गंधर्वगान आहे असे सांगतो -

" सितारों के हैं गीत महान्
मोतियों के अमूल्य, अम्लान,
फेन के अस्फुट, अचिर, वितान,
ओस के सरल, चटुल, नादान,
आँसुओं के अविरल, अनजान
बालुका के गतिवान,
कठिन उर के कोमल उद्‌घात।
अमर है यह गांधर्व विधान। "

[निर्झरगान-पल्लव]

निर्झराच्या अजस्त्र, निर्भय झरझरीतून आपल्याला पुष्कळ काही शिकण्या--सारखे आहे अशी कवीची कल्पना आहे. [निर्झर की अजस्त्र झर-झर-वीणा]

निर्झराच्या नादापेक्षाही पक्ष्यांचा स्वर सुमित्रानंदन पंतांना अधिक मोहित करतो. सकाळच्या प्रहरी पक्ष्यांच्या नाद संगीताची उधळण होते आणि कवी त्या संगीतात तल्लीन होऊन जातो. प्रात:काली प्रमुदित विहगकुमारी आपले प्रिय गान गाऊ लागते आणि सा-या "तुहिन वन" भर तिची "स्वर्ण-जालसी तान" भरून जाते. या गाण्यावर खूष होऊन तो

तिला म्हणतो,

" स्वर्ण पंखों की विहग कुमारि,
अमृत है यह पुलकों का गान। " [सोने का गान]

"गाता खग", "विहग विहग", "विहग के प्रति", "तेरा कैसा गान, विहंगम। तेरा कैसा गान ?" यासारख्या कवितांत पक्ष्यांचा स्वर धरून ठेवलेला दिसतो. पक्ष्याच्या मधुर सुरावटीने जगाचे जीर्ण, विषण्ण उद्यानही मुखरित होऊन जाते असे कवी समजतो,

" विजन वन के ओ विहग कुमार
आज घर घर के तेरे गान
मधुर मुखरित हो उठा-अपार
जीर्ण जग का विषण्ण उद्यान। " ["विहग के प्रति"-गुंजन]

मंगलगीत गाणारे प्रभातकालीन पक्षीसमुदायाचे नादचित्र "विहग विहग" या कवितेत कवीने रेखाटले आहे. हे पक्षी घोळक्या घोळक्याने सारीकडे चिवचिवाट करू लागतात आणि त्यांचा तो चिवचिवाट कवीचे मन वेधून घेतो. अरुणोदयाचे प्रथम भान होते ते विहंगिनीलाच. तीच जागृतीचे गीत प्रथम गाते. ती नभचारिणी बनून सुख आणि सुगंधाचे आडवे उभे धागे विणते. [ "प्रथम रश्मिका रंगिणी" वीणा ]

सुमित्रानंदन पंतांचा प्रदेश हा विशेषेकरून मेघाच्छादित, त्यामुळे मेघाच्या स्वराशी त्यांचे नाते जुळावे हे स्वाभाविकच होय. श्रावणातील मेघ गंभीर गर्जना करून गगनाचे गीत गातात. पावसाळ्यात कवीला निसर्गात स्वरांचे एक संमेलनच भरल्यासारखे वाटते. झरे खळखळून वाहतात, रातकिडे आपले सामूहिक गीत उधळू लागतात, ढग गडगडाट करतात, पावसाचे थेंब

टपटप आवाज करतात, बेडकांचे डरांव-डरांव चालू होते. कवीने हे सर्व स्वर एकत्रित पकडले आहेत,

" पपीहों की वह पीन पुकार
निर्झरों की भारी झर झर,
झींगुरों की झीनी झनकार
घनों की गुरु गंभीर घहर,
बिंदुओं की छनती छनकार. " [भादों की झरन-पल्लव]

"सावन" कवितेत कवीने वर्षाकाळाचे असे संश्लिष्ट चित्र उभे केले आहे-

" झमझम झमझम मेघ बरसते हैं सावन के।
छमछम छम गिरती बूँदें तरुओं से छनके।
चम चम बिजली चमक रही है उर में घन के।
× × × × × ×
दादुर टर टर करते, झिल्ली बजती झन झन।
म्याँऊ म्याँऊ मोर, पीऊ पिऊ चातक के गण। "

अंगणात नाचणाऱ्या केकीची मृदू केका ऐकून कवी आश्चर्यचकित होतो आणि वन वन उपवनामध्ये चाललेल्या नव्या वयाच्या भ्रमरांचा गुंजारव त्याचे मन वेधून घेतो. "मधुपकुमारी"ला कवी आपले मधुर गायन शिकवण्याची प्रार्थना करतानाही दिसतो.

पंतांच्या उत्तरकालीन कवितांमध्ये निसर्गाच्या यथातथ्य चित्रणाकडे त्यांचा कल अधिक दिसतो आणि मग,

" बाँसों का झुरमुट -
संध्या का झुटपुट
है चहक रही चिड़ियाँ
टी-वी-टी-टुट् टुट् टुट् टुट् " [गुंजन] असे वर्णन तो करू लागतो.

[क] अन्य संवेदना

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेत प्रामुख्याने रंग आणि नाद यांच्याच संवेदनांचे आधिक्य आढळते, आणि असे होणे हे निसर्गकवींच्या दृष्टीने तर स्वाभाविकच होय. सुंदर निसर्ग परिसरात शिरल्यानंतर डोळे आणि कानच तृप्त व्हावयाचे. बालकवींच्या कवितेत स्पर्श, गंध आणि रस यांच्या संवेदना फारशा आढळत नाहीत. प्र. गंगाधर गाडगीळ रस आणि गंध या संवेदनांबद्दल लिहितात की, "एकंदर कलांच्या क्षेत्रात या संवेदनांना तितकेसे महत्त्वाचे स्थान नाही." [१] बालकवींनी मृदू स्पर्शाची संवेदना खालील दोन उदाहरणांत व्यक्त केली आहे-

" हिरवे हिरवे गार गालिचे - हरित तृणाच्या मखमालीचे "

" चोहीकडे लसलशीत बहरल्या हिरवाळी छान. "

या उदाहरणांत "मखमालीचे" आणि "लसलसत्या" शब्दांनी मृदू स्पर्शाची संवेदना टिपली आहे. बालकवी उष:कालच्या सुगंध-शीतल, मृदुल, मंद वाताचा उल्लेख करतात. [अरुण कविता] "पाखरास" या कवितेत स्वप्नदर्शन, अश्रुपात, रोमांच आणि मंद वायूचा सुखद स्पर्श या संवेदनांचे असे चित्र आले आहे -

" निद्रित भूमीला स्वप्न जणो हे दिसले
स्वप्नात लाडके, सुंदर डोळे भिजले
स्मरता ही जया हो रोमांचाची भरती

---

[१] प्र. गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रका. मुंबई, प्र.आ., १९७७, पृ. ५२.

मधु मंद अहा ती घटका सौख्यद होती." [पाखरास]

एके ठिकाणी दरवळणा-या केवडयाचा उल्लेख आलेला आहे. " मोदभरे, रानभरे, मंद सुगंधाने विखरे" या ओळीत सुगंध हा नुसता शब्द आला आहे. " रव करिती, भृंगतति, पुष्पांचा मकरंद पिती" हे रस संवेदनेचे एक मामूली उदाहरण आहे. रूप आणि नाद यांच्या संवेदनांच्या तुलनेने गंध, स्पर्श आणि रस यांच्या संवेदना बालकवींच्या कवितेत चुकून-माकूनच आलेल्या दिसतात. बालकवींच्या कवितेतील स्पर्श संवेदनेच्या अभावाचा निर्देश करून डॉ. रा. शं. वाळिंबे पुढे लिहितात, " घाणेंद्रियाचा विषय जो गंध त्याची दखलही बालकवींना नाही...... मनाला धुंद व उन्मत्त करून टाकणा-या सुगंधाचे सौंदर्य बालकवींना माहीत नाही....... जिव्हेचा विषय जो रस त्याचेही वर्णन बालकवींनी केले नाही. तात्पर्य, पंचेंद्रियांच्या विषयांपैकी शब्द [ध्वनी] व रूप [दृश्य जगत्] या दोनच विषयांची संवेदना बालकवींना आहे असे दिसते.[१]" तथापि साकल्याने पाहाता बालकवींच्या संवेदनांचे विश्व रसरशीत आणि समृध्द आहे. वाङ्मयीन संकेतांच्या दडपणामुळे पूर्वीच्या काव्यात हे संवेदनांचे विश्व गुदमरले होते. त्याला मुक्त केल्याशिवाय आधुनिक मराठी कवितेचा विकास होणेच शक्य नव्हते. केशवसुतांनी या कार्याला सुरवात केली होती, पण त्यात त्यांना फार थोडे यश मिळालेले दिसते. प्रा. गंगाधर गाडगीळ सांगतात त्याप्रमाणे "बालकवींनी मात्र या संवेदनांच्या विश्वाला सहजतया मुक्त करून टाकले.[२]"

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल, पुणे, प्र. आ. १९८६, पृ. ३८.

[२] गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रका. मुंबई, प्र. आ. १९७७, पृ. ५४.

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेतही रंग आणि नाद यांच्या संवेदनांची समृध्दी दिसते. त्यांच्या सापेक्षतेने अन्य संवेदना फारच थोड्या व्यक्त झाल्या आहेत. त्यांचे भ्रमर "गंध-अंध" होऊन जागजागी गुंजारव करीत असतात. त्यांचा दिशा-वातही "गंध-अंध" बनतो. आम्रमंजिरीच्या मधु-वासाची ते नोंद करतात. त्यांची पालवी आपले ओठ हलविते आणि या पालवीने त्यांची डहाळी रोमांचित होते. सुमित्रानंदन पंतांनी "रँगीले- गीले फूलोंका" अर्थात् रंगीत ओलसर फुलांचा काही ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्यांच्या कवितेत "शीतल शशिकर" फुलांच्या पाकळ्यांचा बुरखा दूर सारतात. "वीचिविलास"चे वर्णन करताना ते सांगतात,

" छुई मुई सी तुम पश्चात्
छूकर अपना ही मृदु गात,
मुरझा जाती हो अज्ञात। " [वीचिविलास]

लाजाळूच्या झाडाप्रमाणे आकसून जाणा-या लाटांचा येथील निर्देश अत्यंत मार्मिक आहे. चांदण्यारात्री गंगेमध्ये आकाशाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. कवी गो-या अंगावरील जरतारी मऊसर साडीची स्पर्श संवेदना खालीलप्रमाणे प्रकट करतो -

" गोरे अंगों पर सिहर, सिहर, लहराता तार तरल सुंदर
चँचल अँचल सा नीलाम्बर। " [नौकाविहार]

आतापर्यंत आपण बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या संवेदनांचा अभ्यास केला. ही संवेदनाभिव्यक्ती कवीचे खरे सामर्थ्य असते. प्रा. गंगाधर गाडगीळ सांगतात, "संवेदनांना शब्दांकित करणे, त्यांच्या स्पर्शाने शब्दांना पुलकित करणे, त्यांचे आकार शब्दांत उतरवणे, हे कोणत्याही कलावंताचे मूलभूत कर्तव्य असते. संवेदना हे अनुभवांचे मूळस्त्रोत आहे. ह्या मूळस्त्रोताची

गंगा खळाळून वाहात असली, तरच अनुभवांची शेते तरारून वाढतात. तेव्हा कवितेत शब्दांकित झालेल्या संवेदनांच्या विश्वाची समृध्दी हे तिच्या थोरवीचे एक महत्त्वाचे गमक आहे. " [१] बालकवि आणि सुमित्रानंदन पंत हे दोघे या गमकानुसार फार उच्च कोटीचे कलावंत ठरतात. या दोघांचीही कविता संवेदनासौंदर्याने भरुन राहिलेली आहे. काव्यातील संवेदना सौंदर्याचा शोध घेताना शोधकाला या कवींची दखल घ्यावीच लागेल.

## [२] भाव सौंदर्य

काव्य हा वस्तुव्यक्तिसंबंध असतो, याचा आपण पूर्वी विचार केलाच आहे. निसर्ग ही वस्तू कवींच्या दृष्टीने मुळातच सुंदर आहे. या वस्तूकडे पाहता पाहाता कवीचे हृदयस्थ भाव उत्कट होतात आणि मग या हृदयस्थ भावांचा वस्तूवर सुंदर साज चढतो. काव्याच्या आस्वादामध्ये वस्तूचे सौंदर्य जसे पाहावे लागते, तसेच भावसौंदर्यही लक्षात घ्यावे लागते. निसर्ग ही मुळातच कवींच्या दृष्टीने सचेतन वस्तू. निसर्गाला सचेतन मानण्यापासून कविभावनेचा आविष्कार होऊ लागतो, आणि मग वस्तू आणि व्यक्ती यांच्या या सचेतनत्वातून केवढे तरी भाव-सौंदर्य व्यक्त होऊन जाते.

### भावसौंदर्य : बालकवी

बालकवींचे सारे लक्ष "सौंदर्य" या एकाच तत्त्वावर केंद्रित झालेले दिसते. सौंदर्याचा साक्षात्कार हेच त्यांच्या जीविताचे एकमेव ध्येय होते. सृष्टीच्या रमणीय स्वरुपात या सौंदर्याचा त्यांना साक्षात्कार होत असे,

---

[१] प्रा. गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर, मुंबई, प्र. आ. १९७७, पृ. ५४.

आणि मग पराकाष्ठेच्या उल्हसित अवस्थेत त्यांना सृष्टीत सर्वत्र आनंदच आनंद भरून राहिलेला आहे असे वाटे. निसर्गात सर्वत्र आनंद भरलेला आहे हा विचार बालकवींनी अनेक वेळा सांगितला आहे. "आनंदी-आनंद" या कवितेत ते सांगतात,

" आनंदी-आनंद गडे ।
इकडे तिकडे चोहिकडे
वरती खाली मोद भरे
वायूसंगे मोद फिरे,
नभात भरला
दिशांत फिरला
जगात उरला,
मोद विहरतो चोहिकडे
आनंदी-आनंद गडे । " [आनंदी-आनंद]

आकाशातील "नाचरा" आनंदोद्रेक पाहून पर्वत जणू समाधिस्थ झाला आहे अशी कल्पना "अष्टदिशांचा गोफ" या कवितेत आली आहे. "स्थिर भरला परमानंद" ही कल्पना "बाळे ती खेळत होती" या कवितेत येते.

बालकवींना सगळीकडे दाटून राहिलेल्या आनंदाप्रमाणेच सर्वत्र प्रेमच प्रेम भरलेले आहे असे वाटते. निसर्गाच्या सर्व क्रियाव्यापारांत त्यांना प्रेमच प्रेम आढळते. पृथ्वीवर "प्रेमाचा लोंढा" वाहातो आहे अशी ते कल्पना करतात. ही प्रेमभावना त्यांच्या चित्तात रमणीयता निर्माण करते.आणि नंतर या रमणीयतेचे संगीतात रूपांतर होते. ते सांगतात,

" प्रेमाचे अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वी दिसे
चित्ताची रमणीयता उतरूनी संगीत होते तसे "

या संगीतात कवीच्या सर्व उत्कट भावनांना व्यक्त रूप प्राप्त झालेले दिसते. अर्थात् ज्या सौंदर्याच्या दर्शनाने त्यांच्या सा-या चित्तवृत्ती तल्लीन होतात ते सौंदर्य निसर्गाच्या विविध स्वरूपात आढळलेले सौंदर्य आहे. त्यामुळेच त्याच्या दर्शनाने बालकवींच्या मनात निर्मळ आनंदाची आणि उदात्त प्रेमाची भावना निर्माण होते. या भावनेतूनच मग चित्ताला शांती लाभते. "फुले शांतिची अहा उधळली जगती चौफेर" असा अनुभव येऊ लागतो. बालकवींच्या निसर्गगीतांमध्ये अनेक वेळा "प्रेम" आणि "प्रीती" हे शब्द आलेले आहेत, पण या सर्व ठिकाणी स्त्री पुरुषांमधील शारीरिक आकर्षण अशी कल्पना त्यांच्या मनात मुळीच नसते. "अरुण" कवितेत दिवस हा प्रियकर आणि रजनी ही प्रेयसी अशी कल्पना करून बालकवी वर्णन करतात –

> "दिवसयामिनी परस्परांचे चुंबन घेतात
> अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनात। "

संध्याकालीन वारा फुलराणीचे "चुंबन" घेतो अशी कल्पना "फुलराणी" या कवितेत आली आहे. मायावी भास्कर जाता जाता संध्यारजनीचा "साखरचुंबा" घेतो अशी एक कल्पना "संध्यारजनी" कवितेत येते, पण चुंबनाच्या या वर्णनात कामुकतेचा लेष अथवा उन्माद आढळत नाही. बालकवींचे प्रेम हे दिव्य सौंदर्याचे प्रेम आहे आणि हे दिव्य सौंदर्य त्यांना निसर्गातच आढळले आहे. अरुणोदयाच्या वेळची नभःश्रीच्या गालावरील लाली पाहिली म्हणजे प्रीतीची ध्वजा फडकत आहे असे त्यांना वाटू लागते. "अरुणोदया"ला ते "प्रेमकाळ"च समजतात. सूर्याचा हात प्राचीच्या गालाला लागल्याने ती लाजून अधोवदन होते आणि, "प्रेमाची अद्भुत लहरी" पृथ्वीवर येते. या "प्रेमाच्या लाटेखाली मस्तक नमवावे" अशी लालसा कविमनात जागी होते.

बालकवींना सगळीकडे "प्रेमाची लाट", "प्रेमाचा लोंढा" आकाशातून पृथ्वीवर उतरत आहे असे वाटते. विशेषत: उष:काली आणि संध्याकाळी या प्रेमाला पूर आल्याचे त्यांना जाणवते. सूर्यास्ताच्या समयी पश्चिम दिशाही प्राचीप्रमाणेच प्रेमाने भारली जाते. पश्चिमदिग्वदनी "प्रेमपतारका" चमकू लागते, तारकाबालिका आकाशात प्रेमक्रीडा करण्यासाठी जमू लागतात. त्या गगनमंडळी फेर धरून रजनीदेवीच्या प्रेमाची गाणी दिशादिशाला गाऊ लागतात. आणि हे प्रेमाचे विश्वव्यापी चित्र पाहून कवीचे चित्तही "प्रेमाच्या निद्रेत रंगून" जाते. या प्रेमचित्रणात कुठेही शारीरिकता नाही. असे हे प्रेम मंगल आणि पवित्र असल्यामुळे साऱ्या सृष्टीचा विनाश झाला तरी टिकून राहील अशी कवीची श्रध्दा आहे. "सृष्टी निमाली स्वर्गहि नुरले, प्रेम मात्र मंगलमय भरलेले " आढळून येईल असे त्याला वाटते.

बालकवींनी निसर्गाच्या केलेल्या मानवीकरणात मानवी जीवनातील अनेक कोमल भावनांचा विलास आढळून येतो. लाजणे, रुसणे, फुगणे, स्वप्न पाहाणे, प्रणय चिंतनात तल्लीन होणे, चिडविणे, खोडी काढणे, यांसारख्या अनेक गोष्टी बालकवींच्या निसर्गात आढळून येतात. आपली मोत्यांची माला चोरून नेली म्हणून नभ:श्री रुसते आणि तिच्या गालाला लाली येते. पूर्वेच्या गालाला सूर्याचा करस्पर्श होतो आणि मग ती लज्जेने अधोवदन होते. मायावी भास्कर जाता जाता संध्यारजनीचा साखरचुंबा घेतो आणि मग लाजलाजून तिचा जीव अर्धामुर्धा होतो, त्यातच तिच्या गालाला रोषाच्या लहरी येतात, पण हा सूर्य दृष्टीआड होताच पश्चिमेला प्रेमसमाधी लागते, आणि मग दिशा तिची समजावणी करू लागतात. त्या तिला म्हणतात,

" किती पश्चिमे। आता त्याचे चिंतन करिशील ?  
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ ?

खिन्नपणा हा पुरे - पुरे ग अश्रूंची माळा
उद्या बरं का तो राणीला अपुल्या भेटेल "

विनोदी संध्यावात फुलराणीचे चुंबन घेऊन तिच्या प्रेमाचे गौप्य बाहेर फोडतो. फुलराणी प्रणयचिंतनात विलीनवृत्ती होते आणि विरहार्त अवस्थेत स्वप्न पाहू लागते. आपल्याकडे कुणी पाहत नाही याची खात्री करुन घेऊन "लाजत लाजत, हळूच हासत" तारका एकमेकींशी खेळू पाहतात. संध्येच्या खिडकीत येऊन एक हसरी तारा "या-या" अशा हळूच खुणा करु लागते. दाहा दिशांना हसता हसता झोप लागते. बालकवींचा निसर्ग असा मानवी भाव भावनांनी भरुन गेलेला आहे. बालकवींचे निसर्गात व्यक्त झालेले हे भाव अतिशय हृद्य, कोमल आणि सुंदर आहेत. प्रा. म. श्री. पंडित लिहितात, "बालकवींच्या कवितेत "सृष्टिसौंदर्याची भावरम्य" शब्दचित्रे आढळतात." [१] प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुखही सांगतात, "बालकवींच्या कवितेत भावनानिष्ठ समानतेची परमोच्च अवस्था जाणवते." [२]

भावसौंदर्य : सुमित्रानंदन पंत

बालकवींची कविता आद्यन्त बालसुलभवृत्तीने भरलेली आहे. त्यामुळे बालसुलभवृत्तीला साजेशा अनेक कोमल, निरागस, अकलुषित सुंदर भावांची पखरण त्यांच्या कवितेत आढळते. सुमित्रानंदन पंतांची बालसुलभवृत्ती स्थिर राहू शकली नाही. ती प्रौढजगतात आणि अध्यात्मातही विहार करताना दिसते. त्यामुळे पंतांच्या कवितेत बालकाच्या, प्रियकराच्या,

---

[१] श्री. म. श्री. पंडीत, आधुनिक कवितेचे प्रणेते, सुविचार, नागपूर, प्र. आ. १९५२ पृ. १७८.

[२] श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख, अंधारयात्रा, मौज प्रका. मुंबई, प्र. आ. १९६८, पृ. ३८.

समाजचिंतकाच्या आणि भक्ताच्या भावना व्यक्त झालेल्या आहेत. त्या भावनांत विविधता असली तरी प्रामुख्याने त्या कोमल आणि सुंदर आहेत. डॉ. देवराज कोमलता हाच पंतांच्या सौंदर्यदृष्टीचा प्रधान विशेष मानतात. [१]

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत "अगणित", "सौ सौ भाव" व्यक्त झालेले आहेत, पण ते "मृदू" आणि सुकोमल आहेत. कवी आपल्या या भावविश्वाबद्दल स्वतःच सांगतो,

१. "कभी उर में अगणित मृदु भाव
कूजते हैं विहगों-से हाय। ["भादों की झरन""वीणा"]

२. विपिन में पावस के - से दीप
सुकोमल, सहसा, सौ सौ भाव
सजग हो उठते नित उर बीच," ["मुसकान", "वीणा"]

जग उपवनामध्ये कवीचे स्वर्ण-नीड असते आणि मग नीरव भाव गगनात आपले मृदुल कल्पनेचे पंख पसरून एखाद्या पक्ष्याप्रमाणे तो गगनात भरा-या मारीत राहातो.

प्रारंभकाळी कवी बालसुलभवृत्तीने निसर्गाकडे पाहाताना दिसतो. तो मधुपकुमारीला आपले गोड गाणे शिकविण्यास सांगतो, विहगबालिकेच्या मृदू, मंगल, कोमल स्वरात स्नान करू इच्छितो, आणि सरितेचे मृदुल भाव तिच्या गीतातून जाणून घेण्यासाठी तिच्या काठाकाठाने फिरतो. कवी निसर्गमातेला म्हणतो -

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, "पंत का भावजगत", आत्माराम, दिल्ली, १९५७ पान १६१.

" द्विटप डाल में बना सदन,
पहन गेरुने रँगे वसन,
विहग बालिका बन, इस वन को
तेरे गीतों से भर दूँ -
संध्या के उस शांत समय। " [वीणा-"तुहिन बिंदु बनकर"]

पण हे बालवय तसेच राहात नाही. काळ आपली कामगिरी बजावीत राहातो. वय वाढत राहाते, पण बालपणाचा मोह सुटत नाही. बालपणाच्या निरागस जीवनाच्या प्राप्तीची इच्छा पंतांनी अनेक कवितांत व्यक्त केली आहे. ते हस-या गुलाबाच्या फुलाला "कहाँ पाया मेरा बचपन ? " असा प्रश्न विचारतात. हिंदकळणा-या हिमजलासारखे डोळे असलेले, अर्धविकसित शरीर आणि मन असलेले, मृदुलतेने भरलेले सुभग, सरळ आणि भोळे असे आपले बचपन गुलाबाच्या फुलात कवी पाहातो आहे. कवी दयामय ईश्वराला आपले "बालापन" परत देण्याची प्रार्थना करताना म्हणतो,

" विहग बालिका का सा मृदु स्वर,
अर्ध खिले, नव कोमल अंग,
क्रीडा कौतूहलता मन की
वह मेरी आनंद उमंग,
अहो दयामय! फिर लौटा दो
मेरी पद प्रिय चंचलता
तरल तरंगों-सी वह लीला,
निर्विकार भावना लता।"[चित्रकार! क्या करुणाकर फिर"-वीणा"]

यौवनाच्या मादक हातांनी आपल्या निरागस बाल्यकलिकेला दवबिंदूप्रमाणे हिरावून घेतले आणि आपले मधुमय बोबडे गाणे लपवून ठेवले अशी तक्रार कवी करतो. पंतांच्या कवितेत बालजीवनातील अशा अनेक भाव-भावना व्यक्त

झाल्या आहेत, पण बालजीवनाची ही आसक्ती स्थिर राहू शकत नाही.

सुमित्रानंदन पंत प्रेमपथावरून वाटचाल करू लागतात आणि मग सृष्टीचे प्रत्येक तत्त्व प्रेयसीच्या सौंदर्याशी समरस झाल्यासारखे त्यांना वाटते. स्वप्न आणि आकांक्षांचे एक नवे जगत त्यांच्यापुढे उभे राहाते. प्रणयाच्या भावर्भऱ्या कल्पना अशावेळी उत्तेजित होतात आणि मग निसर्गामध्ये आपल्या प्रेयसीचे रूप विखरलेले आहे असे कवीला वाटू लागते -

" आज उन्मद मधु-प्रात
गगन के इन्दीवर से नील
झर रही स्वर्ण-मरन्द समान
तुम्हारे शयन शिथिल सरसिज उन्मील
छलकता ज्यों मदिरालस, प्राण। "

उषा या प्रेयसीच्या दर्शनासाठी आपल्या खिडकीत येऊन ताटकळत राहाते आणि संध्या शून्य नभाच्या अंगणात तिची प्रतीक्षा करते. आपल्या प्रेयसीच्या रूप-माधुरीमध्ये निसर्गातील सारे सौंदर्य एकवटून गेले आहे असे कवीला अनेक ठिकाणी वाटत राहिलेले आहे. आपल्या प्रियेला तो म्हणतो,

" अरुण अधरों की पल्लव प्रात,
मोतियों का हिलता हिम हास,
इन्द्रधनुषी पट से ढँक गात
बाल-विद्युत् का पावन लास,
हृदय में खिल उठता तत्काल
अधखिले अंगों का मधुमास
प्रिये, प्राणों की प्राण। "

आपल्या या सुमुखीला कवी निसर्गातील कोमल सुंदर वस्तूंनी सजवीत असलेला

अनेक कवितांत दिसून येतो. त्या दृष्टीने "सुधि" ही कविता वाचनीय आहे. हा प्रणयाचा खेळ कवीला निसर्गातही आढळून येतो. नववसंताच्या सरस स्पर्शाने वसुधा पुलकित होते आणि शस्यावलीच्या यौवनभाराने तिच्या यौवनाचा भर लक्षात येतो. उदधी आपल्या अगणित बाहूंनी इंदुकरांना आलिंगन देतो आणि विपुल चटुल लहरी ता-यांचे फेनिल चुंबन घेतात. कवीला निसर्गातील अणु-अणू प्रेमरसात बुडून गेलेला दिसतो. स्वत:चे हृदय वियोग-दग्ध झाले असतानाही तो निसर्गात संयोगच राहावा अशी इच्छा व्यक्त करीत म्हणतो -

" शैवालिनि! जाओ, मिलो तुम सिंधु से,
अनिल! आलिंगन करो तुम गगन को,
चंद्रिके! चूमो तरंगों के अधर,
उडुगणो! गाओ, पवन वीणा बजा! " ग्रंथि.

लोकमंगलतेचा, जगाच्या कल्याणप्रदतेचा भाव पंतांच्या कित्येक कवितांत व्यक्त झालेला आहे. जगाचा जुनेपणा, रूढिवादिता नष्ट होऊन जावी अशी इच्छा त्यांच्या काही कवितांत आविष्कृत झालेली दिसते. ते जुन्या युगाला जीर्ण पत्र, मृत विहंग समजतात आणि त्या जीर्ण पत्राला ते गळून पडण्यास व मृत विहंगाला अनंतात विलीन होण्यास सांगतात. कवी नव्या आशेने, नव्या अभिलाषेने, उल्हासाने जग-जीवनाकडे पाहतात,

" जग-जीवन में उल्लास मुझे,
नव आशा नव अभिलाष मुझे! " ["गुंजन"]

तो ईश्वरापाशी प्रार्थना करतो -

" हो धरणि जनों की, जगत स्वर्ग-जीवन का घर
नव मानव को दो, प्रभु! भव मानवता का वर! " ["ग्राम्या"]

सुमित्रानंदनांचा ईश्वरावर विश्वास आहे. "ईश्वर पर चिर विश्वास मुझे" असे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. सुमित्रानंदन पंतांचा हा श्रध्दा भाव काही कवितांत व्यक्त झाला आहे. त्या दृष्टीने "मौन निमंत्रण" या कवितेचा उल्लेख करता येईल. कवीला सृष्टीभर त्या अज्ञात--शक्तीचा संदेश भरून राहिला आहे असे वाटते. फुलांच्या सुगंधात त्याला ईश्वराचा संदेश ऐकू येतो -

" देख वसुधा का यौवन भार
गूँज उठता है जब मधुमास,
विधुर उर के से मृदु उद्‌गार
कुसुम जब खुल पडते सोच्छ्‌वास
न जाने सौरभ के मिस कौन
सन्देशा मुझे भेजता मौन। " - "मौन निमंत्रण".

आकाश आणि समुद्र, प्रभात आणि रात, वर्षा आणि मधुमास, ज्योत्स्ना आणि अंधःकार, जागृती आणि स्वप्न - या सा-यातून कवीला त्या अज्ञाताचे मौन निमंत्रण मिळते. तारे आणि लाटा, दवबिंदू आणि काजवे, विद्युत् आणि सुगंध हे सारे दूत बनून ईश्वरी संकेत कवीपाशी पोहोचवितात. हे संकेत मोठे कोमल आणि सुकुमार असतात,

" स्वर्ण, सुख, श्री सौरभ में भोर
विश्व को देती है जब बोर
विहग कुल की कल-कंठ हिलोर
मिला देती भू-नभ के छोर,
न जाने-अलस-पलक दल कौन
खोल देता तब मेरे मौन। "

कवीने प्रेमभंगाची व्यथा अनुभविली आहे, ऐहिक जगात आढळणा-या दु:खाची त्याला जाण आहे तथापि सुमित्रानंदन पंत मोठे आशावादी आहेत. त्यामुळे जगातील सौंदर्याकडेच ते अधिक आकर्षिले जातात. त्यांच्या कवितांत आढळणा-या भाव-सौंदर्याची अनेक उदाहरणे देता येण्याजोगी आहेत. "वीणा" या काव्यसंग्रहातील बालभावुकता स्पष्ट करीत डॉ. पी. आदेश्वर राव लिहितात, " वीणा में बालकवि की बालभावुकता शत शत गीतों में उमड पडी है। भावों में बालकोंकी सी सरलता, निर्मलता, जिज्ञासा, भोलापन है।[१] " आणि "पल्लव" या काव्यसंग्रहात "कवि ने सुख, श्री, सुषमा का मनोहर स्वप्न जगत" रचल्याचे[२] डॉ. अवधबिहारी राय सांगतात.

## [३] कल्पना-सौंदर्य

काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये कल्पनेचे स्थान अतिशय महत्त्वाचे असते. तीच कविमनोगत भावांचे पोषण करते आणि अभिव्यक्तीला सहाय देत राहाते. कल्पनेचा संबंध मानसिक सृष्टीशी असतो. वस्तूचे स्वरूप निश्चित करणे, नवनिर्मिती करणे, सूचक अर्थाची अभिव्यक्ती करणे या गोष्टी कल्पना करीत असते. पाश्चात्त्य जगतामध्ये असाधारण कल्पना हीच काव्यनिर्मितीची शक्ती मानली गेली आहे. स्टुअर्ट यांनी, "An uncommon degree of imagination constitutes poetical genious." असे म्हटलेले आहे. कवी कल्पनेच्या मदतीनेच अमूर्त वस्तू चित्रित करतो, अरूपाला रूप देतो, कवितेच्या विविध घटकांत समन्वय साधतो, नवनिर्मिती करून जातो आणि काव्यामध्ये सरसता आणि सुंदरता यांचा आविष्कार करतो. खरोखर काव्यनिर्मितीमध्ये कल्पनेचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांच्याही कवितेत कल्पनाशक्तीचे सामर्थ्य पुरेपूर आढळते.

---

[१] डॉ. पी. आदेश्वर राव, कविपंत और उनकी छायावादी मान्यताएँ, प्रगति प्रका. आगरा, १९७२, पृ. ९४.

[२] डॉ. अवधबिहारी राय, पंत की काव्यगत मान्यताएँ और उनका काव्य, संजय प्रका. वाराणसी, प्र. १९८०, पृ. ११३.

## कल्पना-सौंदर्य : बालकवी

बालकवींनी चितारलेली निसर्ग दृश्ये सत्यसृष्टीपेक्षा कल्पनासृष्टीतील अधिक आहेत. याबाबतीत त्यांच्यात व वर्ड्स्वर्थमध्ये फार मोठा फरक दिसतो. निसर्गातील वस्तू जशा तसे त्यांचे वर्णन वर्ड्स्वर्थ करतो. उलट बालकवी वास्तवतेच्या जागी काल्पनिक वातावरणाचे चित्रण करतात. ते सृष्टीतील वस्तूचे वास्तव रूप आपल्या इच्छेप्रमाणे बदलून टाकताना दिसतात. वैचित्र्यपूर्ण रूपके, उत्प्रेक्षा, आणि उपमांची योजना करून ते आपल्या कल्पना-विलासाने वाचकांचे मन तल्लीन करून सोडतात. वास्तव चित्रापेक्षा बालकवी कल्पनारम्य चित्रे कशी रेखाटतात याची अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत सहजगत्या मिळतात. "बाळे ती खेळत होती" ही सारीच कविता अशा कल्पनारम्य चित्रांनी भरलेली आहे. त्यातील एक कल्पना रम्य चित्र असे,

" बैसून सूर्यकिरणात । सोन्याच्या कारंज्यांनी
कधि जलदजाल खुलवावे । स्वर्गीय सुधेने त्यांनी
कधि चंद्रकला सजवावी । नवरंगी हार विणोनी
शांतीचा करुनी पावा
अवकाशी सूर भरावा
नक्षत्रलोक खुलवावा
सौंदर्ये उधळित होती । बाळे ती खेळत होती." ["बाळे ती खेळत होती"

"ताराराणी" या कवितेत बालकवींनी आपल्या उत्कृष्ट कल्पना विलासाने अशीच एक स्वप्नसृष्टी उभी केली आहे -

" निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खाली,
वर मूक मोहने जैसी । शशिकिरणे विरघळलेली,
इवलाच अधर हलवून । जल मंद सोडिते श्वास,
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हा पवनास.

निश्चिंत शांतिदेवीचा। किंचितसा अंचल हाले,
रोमांच कपोली भरती। कुंजांत कोकिळा बोले.
घननील लतावलयात। हिमधवल शिला तल भागी
चमकून मोहिनी झाली। जणु कुंजगुंजने जागी
सौंदर्य-भरी भरलेले। तारुण्य चढे रंगास
अलवार कोवळे अंग। जशि काय फुलांची मूस
धरि आम्र मंजिरी कानी। हातात जुईची वेणी
कंठात मालतीमाला। माधवीच भासे बाला." [तारराराणी]

निसर्गातील एखादे दृश्य पाहिल्यावर असंख्य कल्पनाचित्रे बालकवींच्या डोळ्यांसमोर तरळू लागतात. अनंत कल्पनांनी त्यांचे मन मोहरून जाते. त्यांच्या कल्पनांचा बराचसा विहार अप्सरांच्या आणि प-यांच्या सृष्टीत होतो. त्यांची कल्पना अशी अवखळपणाने व्यक्त होते. "अरूण" या कवितेत बालकवींनी अगदी मुक्तपणे कल्पनांची उधळण केलेली दिसते. पूर्वसमुद्री रम्य सुवर्णाच्या पसरलेल्या छटेकडे पाहून कवीला वाटते की जणूकाही कुणी लाल गुलाबाची आकाशात मूठच उधळली आहे. उज्ज्वल दीप्तीने सारविलेली क्षितिजाची कड म्हणजे कवीला सृष्टिसतीने गळयात घातलेले अनुपम लेणे वाटते. अरूणोदयकाली आकाशपट रंगीत दिसतो आणि मग कवी कल्पना करतो -

" अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला की हा कविराय ?
की नवयुवती उषासुंदरी दारी येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनी ?
दिवसयामिनी परस्परांचे चुंबन घेतात -
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनात।
स्वर्गीच्या अप्सराच अथवा गगनमंडलात

रात्रीला शेवटची मंगल गीते गातात ?
किंवा "माझी चोरुनि नेली मोत्याची माला"
म्हणुनि नभःश्री रुसलो, आली लाली गालाला ? " ["अरुण"]

डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात, " आकाशातील ढगांचे रंग जसे क्षणाक्षणाला बदलतात, त्याप्रमाणे बालकवींच्या कल्पनाविलासाचे सौंदर्य क्षणाक्षणाला निरनिराळी रुपे धारण करुन प्रकट होते आणि शेवटी असंख्य लोलक लावलेल्या झुंबराप्रमाणे त्याची शोभा दिसू लागते. [१] " क्षणाक्षणाला निर--निराळी रुपे धारण करणाऱ्या बालकवींच्या या कल्पनाविलासाचे सौंदर्य "अरुण", "संध्यारजनी", "फुलराणी", "तारकांचे गाणे", "संध्यातारक", "बालविहग", "शुक्रोदय", "बाळे ती खेळत होती" इत्यादी कवितांत पहावयास मिळते. संध्यारजनी या कवितेत तारकांच्यावर योजिलेल्या खालील कल्पनांत केवढे सौंदर्य भरुन राहिले आहे।

" आली होती भरती, आता अस्तसमुद्राला
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला।
कल्पतरुची फुले उडाली की वाऱ्यावरती ?
आकाशीच्या गंगेला की बुद्बुद हे येती ?
नवटिकल्यांची चंद्रकळा की गगनश्री नेसे ?
स्वर्गीचे भांडार उघडले की रात्रीसरसे ?

विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा। " - ["संध्यारजनी"]

बालकवींना उडती बलाकमाला म्हणजे कल्पसुमांची माळ, किंवा अवनीवरती उतरणारे ग्रहगोल वाटतात. बालविहग म्हणजे सांध्यतरंगांनी गिरिशिखराचे

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल प्रका., पुणे, प्र. आ., १९८६. पृ. ३०.

फूल हलल्याने आकाशात भिरभिरणारा त्यातला पराग होय असे भासते. फडफडणाऱ्या दीपशिखेवर बालकवी कल्पना करतात,

" किंवा तुजभवती जमल्या । अदृश्यरूपे दीपकळ्या
की त्यांची फुलली बाग । त्वन्नयनी दिसते सांग
प्रेमभरे चुंबायाला । कडकडुनी भेटायाला
तोडुनि हे हृदयबंध गडे । धावतेस की त्याकडे ? "

बालकवींच्या अशा कल्पनांतील सौंदर्याचे आकंठ पान करून रसिक तृप्त होतात. रसिकाने तृप्त व्हावे अशा जातीचाच बालकवींचा कल्पना विलास आहे.

## कल्पनासौंदर्य : सुमित्रानंदन पंत -

सुमित्रानंदन पंतांचा कल्पनाविलासही बालकवींच्यासारखाच अवखळ आहे, तथापि दोघांच्या कल्पनाविलासात थोडा फार फरक आहे. बाल--कवींचा कल्पनाविलास प्राय: स्वप्नसृष्टीत दंग होतो, पण सुमित्रानंदन पंतांची कल्पना वास्तवाचे भान फारसे सोडीत नाही. वास्तवालाच एक रम्य, मनोहर साज चढविण्यात त्यांची कल्पना दंग झालेली दिसते. त्यांच्या "उच्छ्वास", "वीचि-विलास", "निर्झर-गान", "छाया", "नक्षत्र", "सोने का गान", "बादल" इत्यादी कविता म्हणजे कल्पना पुष्पांनी डवरलेली रम्य वाटिकाच होय. "नौका विहार" या कवितेत गंगेचे मानवीकरण करताना कवीने कसा सुरेख कल्पना विलास केला आहे -

" सैकत शय्या पर दुग्ध धवल, तन्वंगी गंगा, ग्रीष्म विरल,
लेटी है श्रांत, क्लांत, निश्चल ।

तापस बाला गंगा, निर्मल, शशि मुख से दीपित मृदु करतल,
लहरे उर पर कोमल कुंतल।
गोरे अंगों पर सिहर सिहर, लहराता तार तरल सुंदर
चंचल अँचल सा नीलांबर।
साडी की सिकुडन-सी जिस पर, शशि की रेशमी विभासे भर,
सिमटी है वर्तुल, मृदुल लहर।" ["नौकाविहार"]

सिकता शय्येवर दुग्ध धवल, ग्रीष्मातपाने अशक्त झालेली तन्वंगी गंगा शांत पहुडली आहे. निर्मल शशिमुखामुळे तिचे मृदू करतल दीप्त झाले आहेत. लहरींचे कुंतल तिच्या उरप्रदेशावर बागडत आहेत. तिच्या गो-या अंगावर जरतारी नीलाम्बर सळसळत आहे. कुठे तिच्या या साडीवर वर्तुळाकार लाटेने घडी निर्माण झालेली आहे - असे एक सुरेख कल्पनाचित्र येथे आले आहे. त्यांची नौका म्हणजे शिडांचे पंख पसरुन मंद मंद जलविहार करणारी कुणी हंसिनीच होय. अशा अनेक सुंदर कल्पना पंतांच्या कवितेत आढळतात.

सुमित्रानंदन पंत सहस्त्रसुमनांनी डवरलेला मेखलाकार पर्वत आणि त्याच्या पायथ्याशी पसरलेला जलाशय पाहातात आणि मग ते कल्पना करतात -

" मेखलाकार पर्वत अपार
अपने सहस्त्र दृग सुमन फाड
अवलोक रहा है बार बार
नीचे जल में निज महाकार
जिसके चरणों में पला ताल
दर्पण सा फैला है विशाल।" ["सावन"पल्लव]

सुमित्रानंदन पंतांनी मेघावर अनेक कल्पना केलेल्या आहेत. त्यांना कधी

पर्वतात ढग, तर कधी ढगात पर्वत दिसतो, कधी लहान मेघ पर्वतावर कोकराप्रमाणे बागडताना दिसतात, कधी आकाशात इंद्रधनुष्य दिसते. मेघांचा गडगडाट होतो आणि त्यांच्यापासून जलधारा बरसू लागतात. अशावेळी आकाशात विजांचा चमचमाटही दिसतो. या दृश्यावर कवी कल्पना करतो -

" इंद्रधनु की सुनकर टंकार
उचक चपला के चंचल बाल,
दौडते थे गिरि के उस पार
देख उडते - विशिखों की धार," - ["भादों की झरन"-पल्लव]

इंद्रधनुष्य, मेघगर्जनेच्या रूपाने त्याचा टणत्कार, जलधारांच्या रूपाने शरवृष्टी या गोष्टी पाहिल्यावर विजेची चंचल बाळे घाबरून पर्वताच्या पलीकडील भागाकडे पळू लागली अशी वास्तवाधारित पण रम्य कल्पना कवीने येथे मांडली आहे. रात्रीच्यावेळी फुलांतील सुगंध वा-यावर वाहात राहातो. यावर कवी कल्पना करतो की, चंद्राच्या शीतल छायेमध्ये रुचिर, सुकुमार, चंदेरी किरणे नवकलिकेच्या हृदयाचे कोमल द्वार उघडतात, त्याचवेळी भ्रमरबालिका तिला "जग है केवल स्वप्न असार" असे सांगते आणि ते ऐकून कलिका आपला सारा सौरभ भार वायूला अर्पण करते. त्यांची डहाळी आपल्या हृदयाच्या प्रणयकुंजात मूक कोकिळेच्या मादक गीतांनी मधुरतेने भरून येते आणि पालवीच्या रूपाने रोमांचित होऊन जाते. "नक्षत्र" कवितेत कवीने नक्षत्रावर अनेक कल्पना केल्या आहेत. हे नक्षत्र म्हणजे जणूकाही अज्ञात देशाचा कुणी नाविक, अनंताच्या हृदयाचे जणू कंपन, नवप्रभातीचा जणू अस्फुट अंकुर निद्रेचे जणू रहस्यकानन - अशा अनेक चढत्या उत्प्रेक्षा नक्षत्रावर केलेल्या दिसतात. सुमित्रानंदन पंतांचे मेघ शिंपल्यांचे आपले सुभग पंख पसरून प-यांच्या बालकांप्रमाणे शुचिज्योत्स्नेत सुकुमार चंद्रकर धरून मोठ्या

आनंदाने विहार करतात. सुमित्रानंदन पंतांच्या उत्तुंग कल्पनेच्या दृष्टीने खालील उदाहरण लक्षणीय आहे,

" स्वर्ण भृंग तारावलि वेष्टित,
गुंजित, पुंजित, तरल रसाल,
मधुगृह-से हम गगन पटल में
लटके रहते विपुल विशाल।
जालिक-सा आ अनिल, हमारा
नील सलिल में फैला जाल,
उन्हें फँसा लेता फिर सहसा
मीनों के - से चंचल बाल। " - बादल

हे मेघांचे वर्णन आहे. मेघ मधमाश्यांच्या मोहळाप्रमाणे गगन पटलावर लटकत राहतात. या मोहोळाचे गुंजित, पुंजित, तरल, रसाल हे वर्णन नेमके टिपलेले आहे. पंतांचे सारे संवेदना सामर्थ्य या शब्दांत कसाला लागलेले दिसते. या मोहोळाला तारावलीच्या मधमाश्यांनी वेढलेले आहे, पण हे दृश्य बदलते आणि वारा एखाद्या शिकाऱ्यासारखा मेघांचे जाळे आकाशात फेकून तारकांची मासोळी पकडू पाहतो. सुमित्रानंदन पंतांची कविता अशा कल्पनासौंदर्याने निथळून निघालेली दिसते.

[४] कला सौंदर्य

कवितेमध्ये आशय जितका महत्त्वाचा तितकीच अभिव्यक्तीही. कवितेमध्ये अभिव्यक्तीचे सौंदर्य नसेल तर आशयाचे सौंदर्यही उणावल्याखेरीज राहणार नाही. काव्याभिव्यक्तीमध्ये कवीची शब्दयोजना महत्त्वाची असते. शब्दांना एक प्रकारचा नाद असतो आणि काव्यात त्यांची तालबध्द

रचना केलेली असते. त्यामुळेच नाद आणि ताल यांना काव्यात महत्त्वाचे स्थान असते. या नाद आणि तालाप्रमाणे शब्दांना अर्थही असतो. कवीला हा अर्थही नेमका टिपावा लागतो. त्यामुळे नाद, ताल आणि काव्याचा आशय यामध्ये काव्यसौंदर्य वृध्दिंगत करणारी सुसंगती निर्माण होत असते. कवितेमध्ये शब्दयोजनेप्रमाणे वृत्तयोजनाही महत्त्वाची. काव्याच्या आशयाला पेलणारे सुसंगत असे वृत्त योजल्याने काव्याचे सौंदर्य वाढलेले दिसून येते. कवितेला एक विशिष्ट आकारही प्राप्त होत असतो. कवितेची ही आकृती किंवा घाट तिच्या सौंदर्यात भर टाकीत असतो. थोडक्यात, कवितेमध्ये अभिव्यक्तीचे किंवा आविष्काराचे सौंदर्य निर्माण व्हावयाचे असेल तर सुभग शब्दयोजना, सुसंगत वृत्तयोजना आणि नितळ घाट यांकडे कवींचे लक्ष असावे लागते. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांच्याही कवितेत या गोष्टींची जाण भरपूर आहे.

## कलासौंदर्य : बालकवी

बालकवी मोठे शब्दप्रभू आहेत. त्यांना शब्दांची वाण कधीच पडली नाही. श्रावणमासातील क्षणात सरसर येणाऱ्या शिरव्याप्रमाणे बालकवींच्या काव्यांगणात शब्दांची सर येत असते, या सरीतील शब्द अतिशय वेचक असतात. या शब्दांत अभिप्रेत असलेली संवेदना मम वाचकां--च्याही मनात नेमकी निर्माण होते. "माणिक हे, बाई गडे झुलते आहे," या फुलाच्या वर्णनातील "झुलते" हा शब्द वाऱ्यावर डोलणाऱ्या फुलाचे नेमके नर्तन डोळ्यांसमोर उभे करतो.

" दंवमाला उपमा कसली तरि त्याला
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरती "

या उदाहरणातील "टपटपती" हा शब्द अत्यंत आकर्षक आहे. "संध्येच्या

सुंदर छाया। निमिषातच काजळताती" या ओळीतील "काजळताती" हा शब्द सूचक व परिणामकारक आहे. "हा कुरणांचा थाट दाटला" यातील "थाट दाटला" या शब्दामुळे हिरवळीचे सौंदर्य व तिचा दाटपणा या दोन्ही गोष्टी प्रकट झाल्या आहेत. "एकदा सडा संध्येचा शिंपून महोत्सव केला" या ओळीत "सडा" हा शब्द अर्थाभिव्यक्तीच्या दृष्टीने अत्यंत मार्मिक आहे. "थबथबली ओथंबुनि खाली आली" मधील "थबथबली" हा शब्द संवेदना निर्मितीच्या दृष्टीने मोठा परिणामकारक आहे. "क्षणात येते सरसर शिरवे," "चोहिकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान", "हिरवे हिरवे गार गालिचे, हरिततृणांच्या मखमालीचे" या वर्णनातील "सरसर", "लसलशित", "हिरवे गार" आणि "मखमालीच्या" या शब्दांनी केवढी संवेदनानिर्मिती केली आहे. "निर्झरास" या कवितेतील "घुमवित", "उडया", "फुगडया", "लोळण", "इवलाली", "सळसळती" या शब्दांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या संवेदना निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. बालकवी अशाप्रकारे अत्यंत वेचक शब्दांची योजना करतात.

बालकवींना शब्दातल्या गोडव्याची अचूक परीक्षा होती. त्यांच्या कवितेत कर्णमधुर शब्दांची नुसती पखरण आहे. एरव्ही अमधुर वाटले असते असे शब्द बालकवी अशा पध्दतीने फिरवतात की तेही गोडसर बनून जातात. पिण्यालाऐवजी प्राशायाला, बुडबुडयाऐवजी बुदबुद, इंद्रधनुष्याऐवजी इंद्रधनू, अंतरपाटाऐवजी अंत:पट असे शब्द त्यांनी वापरलेले आहेत. नादसाम्य तर त्यांच्या कवितेत नुसते उधळले आहे. बालकवी नादसाम्याचा इतक्या विविधप्रकारे उपयोग करतात की, त्यामुळे कवितेच्या नादाला गोडवा तर येतोच, पण शिवाय त्या नादाच्या अनेक सुंदर आकृती निर्माण होतात. "अस्तगिरीच्या अभिनव कुंजी निजला निजनाथ" या ओळीत ही गोष्ट दिसते. "रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनी", "म्हणुनि नभश्री रूसली आली लाली गालाला", "हळूच हलवा हा हिरवा शेला" - अशा श्रुतिमाधुयनि

भरलेल्या अनेक ओळी बालकवी सहज लिहून जातात. "तू तर चाफेकळी" ही सर्वच कविता शब्दयोजनेच्या दृष्टीने निरूपम झालेली आहे.

कवी या नात्याने बालकवींची थोरवी ही की, त्यांच्या काव्यात नाद आणि आशय यांची अपूर्व एकतानता साधलेली आहे. बालकवी जितक्या सहजतेने नादसंगती साधतात तितक्याच अलवारपणे आशयातदेखील संगती निर्माण करतात. त्यांनी ज्या विविध रचना केल्या आहेत त्या म्हणजे खरोखर नादाकृतींच्या परस्परात गुंतलेल्या आशयांचे अनेक घाट आहेत. नाद आणि आशय यांच्या अनुरूपतेची अनेक उदाहरणे बालकवींच्या कवितेत आढळतात.

" तोच एकदा हासत आला
चुंबून म्हणे फुलराणीला"

या ओळीतल्या नादसौंदर्याची "चुंबून" या गोड उच्चाराच्या शब्दाने फार खुलावट झाली आहे.

"जा हळु हळु वळसे घेत लपतछपत हिरवाळीत"

या ओळीत "ळ"च्या पुनरुक्तीमुळे निर्माण झालेल्या नादाकृतीने निर्झराने घेतलेले वळसे वाचकांच्या जाणिवेत साकार होतात. बालकवी असे अत्यंत वेचक आणि व्यंजनागर्भ शब्द योजून परिणामकारक अशी शब्दचित्रे निर्माण करतात. एक सुंदर शब्दचित्र यादृष्टीने त्यांच्या "औदुंबर" या कवितेचा निर्देश करता येईल. "ऐलतटावर पैलतटावर" हिरवाळी घेऊन बेटाबेटातून वाहणारा हा "निळासावळा" झरा नेमका आपल्या नजरेसमोर उभा राहातो. बालकवींच्या या शब्दसृष्टीचा अनेकांनी गौरव केलेला आहे. प्रा. गंगाधर गाडगीळ बालकवींच्या शब्दसामर्थ्याबद्दल लिहितात, "मराठी शब्दसृष्टीत

एवढे अर्थवाही नादब्रह्म झोपलेले असेल याची मला कल्पनाच नव्हती." [१]
डॉ. रा. शं. वाळिंबेही असेच मत व्यक्त करीत सांगतात, "कोणत्याही दृश्याच्या अवलोकनाने ज्या संवेदनांची जागृती बालकवींच्या मनात होत असे त्या संवेदना तत्क्षणी मूर्त स्वरूप धारण करीत असत, याचे मुख्य कारण म्हणजे बालकवींजवळ शब्दांचा खजिना नेहमी भरलेला असे. शब्दांची वाण बालकवींना कधीच पडली नाही. असंख्य शब्द गोजिरवाणा वेष धारण करून त्यांच्या दाराशी जणू नेहमी सज्ज असत व कवी आपणाला केव्हा आत बोलावतो याचीच जणू वाट पाहात असत." [२]

बालकवींच्या काव्यातील नादमाधुर्याचा विचार करताना त्यांच्या शब्दयोजनेप्रमाणेच आशयसुसंगत अशा वृत्तयोजनेचाही विचार करावा लागतो. बालकवींनी योजलेली वृत्ते नुसती गोड नाहीत तर गेय आहेत. त्यांच्या बहुतेक कविता कटावाच्या चालीवर गाता येतात. स्वत: बालकवी कटावाच्या चालीवरच त्या गात असत. बालकवींनी उपयोजिलेल्या वृत्तांची आणि त्यांच्या वैशिष्ट्यांची माहिती सोपानदेव चौधरी यांनी प्रो. भा. ल. पाटणकर यांनी संपादिलेल्या "बालकवीची समग्र कविता" या पुस्तकाच्या परिशिष्ट -२ मध्ये दिलेली आहे. त्यात सोपानदेव म्हणतात, " बालकवींची कविता नुसती वाचली तरी त्यांच्या कवितेत कर्णपालीकडील असा एक संगीतनाद निघतो .......... बालकवींची वृत्तरचना जितकी नाद--माधुर्याने भरलेली, तितकीच ती तालबध्दतेने भारलेली आहे. कवितेच्या एका चरणावरून दुसऱ्या चरणावर सहज तालावर येता येते. कोठेच ओढाताण

---

[१] गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर, मुंबई, प्र. आ. १९७७ पृ. ४९.
[२] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल, पुणे, प्र. आ. १९८६ पृ. ४६.

होत नाही. संगीतशास्त्रातील मात्रांच्या आवर्ताप्रमाणे कवितेतील मधुर शब्दांचे आवर्त साधले आहेत. यामुळे बालकवींची कविता ऐकून श्रोता आपल्या तंद्रीतच आपण होऊन ताल धरायला लागतो." [१]

## कलासौंदर्य : सुमित्रानंदन पंत

बालकवींच्या प्रमाणेच सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत नादमाधुर्याने भरलेली उचित शब्दयोजना आढळते. सुंदर शब्दविन्यास ही त्यांची हिंदीकाव्य साहित्याला दिलेली सर्वात मोठी देणगी मानली जाते. खरोखरच सुमित्रानंदन शब्दासाठी कुठेही, कधीही अडून बसलेले दिसत नाहीत. त्यांच्या कवितेत निरर्थक असा शब्दही कधी येत नाही. एकाच ओळीत "वीचि" आणि "लहर" हे शब्द आले तर ते भिन्न अर्थाने योजलेले दिसतील. शब्दांच्या आत्म्याचे असे सूक्ष्म ज्ञान फार थोड्या कवींत आढळते. सुमित्रानंदन पंतांनी शब्दांच्या आत्म्याचे हे सूक्ष्म ज्ञान पुरेपूर पारखलेले होते. याबाबतीत त्यांचे स्वतःचे निवेदन अतिशय महत्त्वाचे आहे. "पल्लव" या काव्यसंग्रहाच्या भूमिकेमध्ये ते लिहितात, "भिन्न भिन्न पर्यायवाची शब्द, प्राय: संगीत भेदके कारण, एक ही पदार्थ के भिन्न-भिन्न स्वरूपों को प्रकट करते हैं। जैसे, "भ्रू" से क्रोध की वक्रता, "भृकुटि" से कटाक्ष की चंचलता, "भौहों"से स्वाभाविक प्रसन्नता, ऋजुता का हृदय में अनुभव होता है। ऐसे ही "हिलोर"में उठना, "लहर" में सलिल के वक्ष:स्थल का कोमल कम्पन, "तरंग"में लहरों के समूहका एक दूसरे को धकेलना, उठ-उठ कर गिर पडना, "बढो-बढो" कहने का शब्द

---

[१] प्रा. भा. ल. पाटणकर, बालकवींची समग्र कविता, रामकृष्ण बुक डेपो, मुंबई, द्वु. आ. १९५०, पृ. १५५.

मिलता है, "वीचि" से जैसे किरणों में चमकती, हवा के चलने में हौले-हौले झूलती हुई हँसमुख लहरियों का, "ऊर्मि" से मधुर मुखरित हिलोरों का, "हिल्लोल-कल्लोल" से ऊँची-ऊँची बाहें उठाती हुई उत्पात-पूर्ण तरंगों का आभास मिलता है।[१]" पंतांना शब्दार्थाची अशी जाण असल्यामुळे त्यांची फुलपाखरू, संध्या, स्वर्ण-किरण, मंजरीत आम्रतरू, वसंतऋतू आणि शुक्रतारा यांची भावचित्रे अत्यंत मनोरम उतरलेली आहेत.

सुमित्रानंदन पंतांनी "पर्वत प्रदेश में पावस" या कवितेत क्षणाक्षणाला आपले रुप पालटणाऱ्या वर्षाऋतूचे सौंदर्य चित्रित केलेले आहे. त्यांचा पर्वत सजीव बनतो. त्याच्यावर फुललेल्या फुलांच्या डोळ्यांनी तो पायथ्याशी साचलेल्या जलाशयाच्या आरश्यामध्ये आपले प्रतिबिंब पाहात राहातो. हा आशय व्यक्त करताना कवीने चपखल शब्दांची योजना केलेली आहे. कवीची लेखणी चित्रकाराच्या ब्रशाप्रमाणे रेषांचे सामर्थ्य कसे प्रकट करते हे त्यांच्या शब्दयोजनेतून सतत प्रत्ययास येत राहाते. मिलनाच्या आनंदाचे वर्णन करताना कवी सांगतो,

" तुम्हारे छूने में था प्राण,
संग में पावन गंगा-स्नान।
तुम्हारी वाणी में कल्याणि।
त्रिवेणी की लहरों का गान।

अन्य कवींना हा भाव व्यक्त करण्यासाठी आपल्या शब्दांनी अनेक पाने खरडावी लागली असती. "नौकाविहार" कवितेत तर प्रत्येक शब्दात एक एक चित्र व्यक्त झाले आहे. नावेमुळे गंगेवर उठणारे तरंग, त्यांतील प्रतिबिंबित तारकासमूह आणि गंगेवर शुभ्रशिडांचे पंख पसरून हंसिनीप्रमाणे मंद मंथर गतीने चाललेली नौका या सर्वांचे वेगवेगळे चित्र उभे करण्याचे

---

[१] सुमित्रानंदन पंत, पल्लव, [भूमिका], राजकमल, दिल्ली, ८ वाँ सं. १९७७, पृ. २९.

कवीचे शब्दसामर्थ्य खालील उदाहरणांत आढळते -

१. "नौका से उठती जल हिलोर
विस्फारित नयनोंसे निश्चल कुछ खोज रहे चल तारकदल
ज्योतित कर जल का अन्तस्तल। "

२. " मृदु मन्द-मन्द मन्थर मंदर लघु तरणि हंसिनी-सी सुंदर
तिर रही खोल पालों के पर। "

कवीची येथील चित्रणशक्ती अपूर्व अशी आहे.

ध्वनिचित्रण ही सुमित्रानंदनांची मोठी विशेषता होय. ते अशा शब्दांचा प्रयोग करतात की त्या शब्दांच्या ध्वनीतूनच त्यांचा अर्थ स्पष्ट व्हावा. "युगांत" मध्ये संध्येचे चित्रण करताना त्यांनी ध्वन्यात्मक शब्दांची सुरेख योजना केलेली आहे. वावटळीमधील त्यांचा नीम "झूम-झूम कर, झुक-झुककर सर-मर-चर-मर" करत राहतो. ध्वनिचित्राच्या दृष्टीने खालील उदाहरणे द्रष्टव्य आहेत -

१. "झर मर कर पत्रों के पास,
रण मण रोडों पर सायास,
हँस हँस सिकता से परिहास
करती हो अलि, तुम झलमल। " - "निर्झरी"-पल्लव

२. गरज, गगन के गान। गरज गंभीर स्वरों में,
भर अपना संदेश उरों में, औ' अधरों में,
बरस धरा में, बरस सरित, गिरि, सर, सागर में,
हर मेरा संताप, पाप जग का क्षणभर में। - "सावन"-पल्लव

पहिल्या उदाहरणात "निर्झरी"चा खळखळाट, तर दुस-या उदाहरणात मेघांची गर्जना साकार झालेली आहे. पंतांच्या कवितेत रोमिल, ऊर्मिल, रलमल, टलमल यांसारखे शब्द वारंवार येतात. शब्दांच्या ध्वनीतून भाव सुखद करणा-या शब्दांची योजना करण्यात सुमित्रानंदन अतिशय कुशल आहेत.

नेमकी संवेदना प्रकट करणे हेही शब्दांचे एक सामर्थ्य असते. पंतांचे शब्द अशा सूक्ष्म संवेदना पकडताना ठिकठिकाणी दिसतात. मेघ मधमाश्यांच्या मोहळाप्रमाणे आकाशात लटकत असतात. या मोहळाचे वर्णन करताना, "गुंजित, पुंजित, तरल, रसाल" या शब्दांची योजना करून मधमाश्यांच्या मोहळाचे नेमके चित्र त्यांनी टिपलेले आहे. पश्चिमेच्या आकाशात त्यांना "उज्ज्वल, अमंद" शुक्रतारा दिसतो आणि चांदण्यारात्री गंगेच्या लहरी त्यांना चांदीच्या सापाप्रमाणे सळसळत चाललेल्या दिसतात -

" चाँदी के साँपों-सी रलमल नाचती रश्मियाँ जल में चल
रेखाओं-सी खिंच तरल सरल "

या उदाहरणातील रलमल, चलजल हे शब्द अगदी चपखल बसलेले आहेत. तसेच "धकधकती है जलदों से ज्वाल", "रूपहले, सुनहले - आम्र बौर, नीले - पीले औ' ताम्र भौर", "धँस गये धरा में सभय शाल" या ओळींत "धधकती", "रूपहले सुनहले", "नीले पीले", "धँस गये धरा में" या शब्दांनी शब्दांमध्ये संवेदना कशा बांधून ठेवता येतात हेच स्पष्ट होते.

सुमित्रानंदन पंतांनी मात्रिक छंदांचीच अधिक योजना केलेली आहे. हिंदी शब्दविन्यासाच्या प्रकृतीला हे मात्रिक छंदच उपयुक्त होत अशी त्यांची विचारसरणी आहे. अशा मात्रावृत्तांनी शब्दात स्वाभाविकरीत्या विविधांगी ध्वन्यात्मकता येते हे खरे आहे. पंतांच्या कवितेने हे स्पष्ट

केलेले आहे. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत एकप्रकारची संगीतात्मकता येते याचे प्रधान कारण त्यांनी आपल्या गीतांची सृष्टी संगीतात्मक रागरागिणीं-च्या आधारावर केली आहे हे होय. त्यांच्या गीतांतील रागरागिणींच्या योजनेमुळे त्यांच्या गीताला लय आणि ताल यांचा सुंदर साज चढलेला आहे. राहुल सांकृत्यायन सांगतात, "पंतकी सबसे बडी देन हिंदी-काव्य-साहित्य के लिए है, सुंदर शब्दविन्यास और मुक्त शैली।[१]" आणि विजयेन्द्र स्नातक लिहितात, " पंत जी की यह विशेषता है कि अमूर्त, छायाभावों का अंकन वे इस शैली से करते हैं कि अस्पष्ट कहे जाने वाले भाव भी दमकते हुए अपनी आभा का ज्ञान कराते रहते हैं।[२] "

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत कलासौंदर्य अशाप्रकारे भरून राहिलेले आहे.

## निष्कर्ष -

[१] बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही सौंदर्यजीवी कवी आहेत. बालकवींचे सारे लक्ष सौंदर्य या एकाच तत्त्वात केंद्रित झालेले होते. या सौंदर्यतत्त्वाचाच बालकवींना ध्यास लागलेला होता. सुमित्रानंदन पंतांचीही अशीच स्थिती आहे. तेही सौंदर्यातच जगत होते. ते सौंदर्याचे द्रष्टे आणि सौंदर्याचे स्त्रष्टे होते. सौंदर्याचा अगाध सागर त्यांच्या हृदयात उसळी मारीत होता. सौंदर्याला सर्वस्व मानणाऱ्या या दोन्ही कवींच्या काव्यात संवेदना, भावना, कल्पना आणि रचना यांचे अमाप सौंदर्य दाटून राहिलेले आढळते.

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, "हिंदी के युगप्रवर्तक कविपंत" आत्माराम प्रका. दिल्ली, १९५७ पृ. ४३

[२] " " "उत्तरा में पंत का अध्यात्मवाद", आत्माराम प्रका. दिल्ली, १९५७, पृ. ३१०

[२] एकूण कलाव्यवहारातच रंग आणि नाद यांच्या संवेदना आधिक्याने आढळतात. त्यांच्या सापेक्षतेने गंध, स्पर्श आणि रस यांच्या संवेदना फार थोड्या व्यक्त होतात. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेतही रंग आणि नादाच्या संवेदना आधिक्याने आलेल्या आहेत. त्यांच्या तुलनेने गंध, रस, स्पर्श यांच्या संवेदना फार कमी व्यक्त झाल्या आहेत.

[३] कविता हा वस्तु-व्यक्तिसंबंध असतो. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या व्यक्तित्त्वाचे अनेक रमणीय विशेष त्यांच्या कवितेत व्यक्त झाले आहेत. त्यांच्या हृदयातील भावसौंदर्य त्यांच्या कवितेच्या आधारे सहज जोखता येण्याजोगे आहे, तथापि दोघांच्या भावाभिव्यक्तीमध्ये थोडेफार अंतर आहे. बालकवींच्या भावना प्राधान्याने निसर्गसौंदर्याशी निगडित आहेत तर सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत निसर्गसौंदर्याबिरोबरच नारीसौंदर्य आणि मानवसौंदर्याचेही विशद चित्रण येते. त्यामुळे त्यांच्या कवितेत बालकवींच्यापेक्षा भाव विविधता अधिक आढळते.

[४] बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांच्याही कवितेत उत्तुंग कल्पनाशालित्व आहे. बालकवींची कविता प्राय: कल्पनाचित्रातच अधिक रमते. सृष्टीच्या वास्तव रूपापेक्षा कल्पना जगताचे वेड त्यांच्या ठिकाणी अधिक दिसते. याउलट पंतांच्या कवितेत वस्तू आणि व्यक्ती यांचा समतोल आढळतो. त्यांची कल्पनाशक्ती वास्तवाधारेच कल्पनानिर्मिती करते आणि सौंदर्याविष्कार साधते.

[५] बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही सौंदर्यस्त्रष्टे आहेत. सुभग शब्दयोजना, सुसंगत वृत्तयोजना, लय आणि ताल यांचा मेळ व नितळ घाट हे अभिव्यक्ती सौंदर्याचे विशेष दोघांच्याही कवितेत आढळतात.

-o-o-o-o-o-o-o-o-o-

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR